विकणे आहे

भेंडा खुर्द, ता. नेवासा येथील मुख्य गल्लीतील राहण्यास योग्य प्लॉट योग्य किंमत आल्यास तातडीने विकणे आहे.

संपर्क : +91 98503 86599

अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.००। अंक २०० । सोमवार ४ मे २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

देशाचे भवितव्य ठरवणारा आज 'महा-निकाल'

पाच राज्यांसह राहुरी-बारामतीकडे साऱ्यांचे लक्ष

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पाँडिचेरी विधानसभांचा होणार फैसला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : आज सोमवार, ४ मे हा दिवस भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत निर्णायक ठरणार आहे. देशातील पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पाँडिचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल आज जाहीर होणार आहे. या निकालांचा परिणाम केवळ संबंधित राज्यांच्या सत्तेवरच होणार नाही, तर आगामी राष्ट्रीय राजकारणाची आणि केंद्रातील सत्ता समीकरणांची दिशाही यातून स्पष्ट होणार आहे. सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार असून दुपारी १२ वाजेपर्यंत चित्राचे अनेक पैलू स्पष्ट होतील. पश्चिम बंगालमध्ये विक्रमी मतदान झाल्याने देश व त्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. ममता बॅनर्जी विजयाची हॅट्रिक करणार की बंगाली नागरिकांची 'ममता' भाजपला मिळते? याकडे साऱ्यांचेच लक्ष लागले आहे. सर्वांचे लक्ष प्रामुख्याने पश्चिम बंगालकडे लागले आहे. सत्ता राखण्यासाठी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आपले सर्वस्व पणाला लावले असून, ९२ टक्क्यांचे विक्रमी मतदान हे राजकीय अस्थिरतेचे संकेत की क्रांतीचे, हे उद्या स्पष्ट होईल. २९४ जागांच्या विधानसभेत १४८ हा 'मॅजिक फिगर' गाठण्यासाठी तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यात तुंबळ लढत पाहायला मिळत आहे.

दुसरीकडे, तामिळनाडूमध्ये एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली डीएमके सत्ता राखण्यासाठी, तर केरळमध्ये मुख्यमंत्री पिनराई विजयन डाव्यांची सत्ता टिकवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. आसाममध्ये नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स आणि नागरिकत्व दुरुस्ती कायदा यांसारख्या संवेदनशील मुद्द्यांच्या सावलीत भाजपच्या हिमंता बिस्वा सरमा यांची कसोटी लागणार आहे. पाँडिचेरीमध्ये एन. रंगास्वामी पुन्हा सत्ता मिळवणार की काँग्रेस-डीएमके आघाडी बाजी मारणार, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

एकंदरीत, उद्याचा दिवस हा अनेक दिग्गजांचे भवितव्य ठरवणारा आहे. ममता बॅनर्जी, स्टॅलिन आणि हिमंता बिस्वा सरमा यांसारख्या नेत्यांच्या राजकीय प्रवासाला उद्याचे निकाल कोणती कलाटणी देतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. आज दुपारी १२ वाजेपर्यंत देशाच्या राजकीय पटलावर नव्या समीकरणांची जुळवाजुळव सुरू होईल, यात शंका नाही.

पवार, कर्डिले यांचा विजय म्हणजे भावनिक अभिवादन

राष्ट्रीय निकालांच्या झगमगाटात महाराष्ट्रातील दोन पोटनिवडणुकांचे निकालही महत्त्वाचे ठरणार आहेत. राहुरी आणि बारामती मतदारसंघांमधील लढत ही राजकीयदृष्ट्या जरी औपचारिकता असली, तरी कार्यकर्त्यांसाठी ती भावनिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. राहुरी नगर पाथर्डी मतदारसंघात माजी आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर त्यांच्या रिक्त जागेवर त्यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांचा विजय जवळजवळ निश्चित मानला जात आहे. तसेच, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विजयाची औपचारिक घोषणा आज होईल. या दोन्ही जागांवर भाजप-महायुतीचा विजय अपेक्षित असला तरी, समर्थकांसाठी हा विजय एक भावनिक अभिवादन ठरणार आहे.



'सहजयोग' भाग ४३

महाराष्ट्र विश्वाची कुंडलिनी

या महाराष्ट्रात सर्व विश्वाची कुंडलिनी नावाची शक्ती आहे. पण ही कुंडलिनी सुप्तावस्थेत आहे एवढच आहे. पण तिचे परिणाम मात्र आपल्या चरित्रावर, आपल्या संस्कृतीवर आहेत. महाराष्ट्रात सुद्धा असे अनेक लोक होऊन गेले ज्यांचे वर्णन करता येत नाही. ज्ञानेश्वर एक असे झाले तरी आपल्याला माहिती आहेत की कितीतरी संत साधू वारंवार म्हणजे तुम्ही दत्तात्रयांच्या वेळेपासून पाहिले तर आदिनाथ सुद्धा – त्यांच्या आधी पासून आदिनाथ-दत्तात्रयांचे जे अवतरण होते सुरूवातीचे आदिनाथांचे, ते सुद्धा या महाराष्ट्रात झाले. इतकच नव्हे तर जे मोठे मोठे संत-साधू झाले त्यांनी नेहमी महाराष्ट्राला भेट दिली. इतकेच नव्हे तर श्री राम आणि श्री सीता या पुनीत भूमीवर फिरलेले आहेत. त्यांचे चरण या भूमीला लागलेले आहेत. ही भूमी पावन आहे आणि त्या पावन भूमीत तुमचा पावन जन्म झाला आहे. पण आपण पावन आहोत ही कल्पना मात्र फार कमी लोकांना आहे आणि त्यामुळेच सगळे प्रश्न उभे रहातात. तुम्ही पावन आहात म्हणजे तुमच्यात एक फार मोठी शक्ती आहे. ही शक्ती पावित्र्याची शक्ती तुमच्यात आहे. आणि ही जी पावित्र्याची शक्ती आहे ती जास्त वाढवली पाहिजे. सीतेची पावन शक्ती एवढी जबरदस्त होती की रावणासारखा राक्षस सुद्धा तिच्याकडे डोळे वर करून बघू शकत नसे. आपल्या देशामध्ये पावन शक्तीला फार महत्त्व दिलेले आहे आणि ती पावन शक्ती महाराष्ट्रात फार आहे. तुमचा जन्म या पावन भूमीत झाला आहे तर त्या पावन शक्तीला स्मरून सांगते की आपल्यामध्ये आत्मा आहे असे सर्वांनी सांगितले आहे. पण आजपर्यंत सगळ्यांनी सांगितले आहे पण सायन्स काही आत्मा शोधून दाखवू शकत नाही कारण सायन्स फार तर फार आपल्या प्राण शक्तीवरच काम करू शकतो. ०१ फेब्रुवारी १९८२ राहुरी विद्यापीठ अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org

8871519191

सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

महत्त्वाचे..

कुंभमेळा रिंगरोड भूसंपादनास शेतकऱ्यांचा विरोध

नाशिक : आगामी कुंभमेळ्याच्या नियोजनाच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये रिंगरोडसाठी सुरू असलेल्या भूसंपादनाचा वाद चिघळला आहे. मातोरी आणि मुंगसरा या गावांमध्ये भूसंपादनाच्या मोजणीदरम्यान शेतकरी आणि प्रशासन आमनेसामने आले असून, या प्रकरणी शेतकऱ्यांनी प्रशासनावर दडपशाहीचा आरोप केला आहे.

सिंहस्थ परिक्रमा मार्गासाठी ६६.१५ किलोमीटरचा रिंगरोड प्रस्तावित आहे, ज्यासाठी २५ गावांतील ३६५ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. आतापर्यंत ३५ पैकी १९ गावांनी या प्रकल्पाला संमती दिली असली, तरी उर्वरित गावांचा याला कडाडून विरोध आहे. मोजणी प्रक्रियेदरम्यान स्थानिक ग्रामस्थांनी पोलिसांवर मारहाणीचे गंभीर आरोप केले आहेत. आम्ही शांततेत विरोध करत असताना प्रशासनाने महिला आणि वृद्ध नागरिकांवर लाठ्या चालवल्या, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मोजणीची प्रक्रिया बळजबरीने राबवल्याचा आरोप करत, शेतकऱ्यांनी काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. जोपर्यंत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा निकाल लागत नाही, तोपर्यंत मोजणी प्रक्रिया थांबवण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच, ज्या अल्पभूधारक शेतकऱ्यांची राहती घरे या प्रकल्पात बाधित होत आहेत, त्यांची घरे वाचवण्यासाठी रस्त्याची 'अलाईनमेंट' बदलण्यात यावी, अशी आग्रही मागणी आंदोलकांकडून होत आहे.

नसरापूर अत्याचार प्रकरण:

आंदोलकांवरील लाठीचार्जने पेटले राजकारण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : भोर तालुक्यातील नसरापूर येथे ४ वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षीय नराधमाने केलेल्या अमानवीय अत्याचार आणि हत्या प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी, या मागणीसाठी पुणे-बंगळुरू महामार्गावरील नवले पुलावर नागरिक रस्त्यावर उतरले होते. मात्र, यादरम्यान पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केल्याचा आरोप होत असून, या मुद्द्यावरून आता राजकारण तापले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त करत राज्य सरकारला धारेवर धरले आहे.

आंदोलनामुळे झालेली वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर केल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. दुसरीकडे, पुणे पोलीस आयुक्तांनी लाठीचार्ज केल्याचा इन्कार केला आहे. मात्र, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये पोलिसांकडून आंदोलकांवर लाठीमार होत असल्याचे स्पष्ट दिसत असल्याने पोलिसांच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, न्याय मागण्यासाठी जमलेल्या पीडितेच्या कुटुंबीयांना धमकावून, सामान्य नागरिकांवर हात उचलताना पोलिसांचे हात थरथरले नाहीत का? हे राज्य आहे की हुकूमशाही? जनतेचा आक्रोश आणि त्यांच्या तळतळाटाचा शाप या अन्यायी सरकारला नक्कीच भोगावा लागेल. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे लक्षात ठेवावे की, पोलीस यंत्रणेमार्फत न्याय मागणाऱ्यांचा आवाज दाबणे हे मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसलेल्या व्यक्तीला शोभा देत नाही. या घटनेमुळे पीडित कुटुंबीयांना त्वरित न्याय मिळावा आणि या प्रकरणात दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

पोलीस आयुक्त खोटे बोलतात...

पोलीस आयुक्त कॅमेऱ्यासमोर 'आम्ही लाठीचार्ज केलाच नाही' असे धादांत खोटं बोलत आहेत. पण पोलिसांच्या अमानुष लाठीचार्जचे भयानक वास्तव व्हिडीओमध्ये स्पष्ट दिसत आहे. ३ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या झाली, त्यानंतर तिला न्याय मिळावा यासाठी शांततेत आंदोलन करणाऱ्या जनतेवर पोलिसांनी क्रूरपणे लाठ्या चालवल्या, ते पाहून माणुसकीलाही लाज वाटते.

– हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

काका कोयटे, चाकणकर कुटुंब ईडीच्या रडारवर

भोंदू अशोक खरात प्रकरणाची व्याप्ती वाढली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



शिर्डी : भोंदू अशोक खरात याच्या आर्थिक व सामाजिक गैरव्यवहार प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून, आता या प्रकरणाची व्याप्ती वाढून थेट ईडीच्या (प्रवर्तन संचालनालय) चौकशीपर्यंत पोहोचली आहे. या प्रकरणात राजकीय नेत्यांपासून ते पतसंस्था संचालकांपर्यंत अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

समता पतसंस्थेचे संस्थापक आणि राज्य पतसंस्था फेडरेशनचे माजी अध्यक्ष काका कोयटे यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. प्रकृतीचे कारण देत त्यांनी नुकताच अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता, परंतु आता ईडीने त्यांना १० मेपर्यंत चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. समता पतसंस्थेच्या शिर्डी शाखेत खरात याच्याशी संबंधित १०० हून अधिक संशयास्पद खाती आढळली असून, त्यातून ७० कोटींपेक्षा अधिक व्यवहार झाले आहेत. हा पैसा हवाला किंवा मनी लॉन्ड्रिंगसाठी वापरल्याचा ईडीला संशय आहे. दुसरीकडे, रूपाली चाकणकर यांच्या बहीण प्रतिभा आणि त्यांच्या मुलाच्या नावावर असलेल्या चार बँक खात्यांत २ कोटी ७० लाखांचे व्यवहार झाल्याची बाब समोर आली आहे. या खात्यांवर बनावट सही करून व्यवहार झाल्याचा दावा संबंधितांनी केला असला, तरी ईडीने त्यांनाही चौकशीसाठी पाचारण केले आहे. ईडी केवळ पतसंस्थाच नव्हे, तर अशोक खरात आणि त्याची पत्नी कल्पना यांनी शिर्डीत जमीन व्यवहारातून केलेल्या बेकायदेशीर सावकारीचीही कसून चौकशी करत आहे. या व्यवहारात जमीन मालक रावसाहेब गोंदकर, आरोपी अरविंद बावके आणि किरण सोनवणे यांचीही ईडी चौकशी होणार आहे. १० मे पर्यंत या सर्वांना हजर राहण्याचे आदेश दिल्याने खळबळ उडाली आहे. या चौकशीतून कोणती धक्कादायक माहिती बाहेर येते आणि राजकीय वर्तुळात काय भूकंप होतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

हवाला किंवा मनी लॉन्ड्रिंगचा संशय

समता पतसंस्थेच्या महाराष्ट्रात २० पेक्षा जास्त शाखा आणि २३ गोल्ड लोन काउंटर कार्यरत आहेत. संस्थेने १००० कोटींहून अधिक ठेवी असून, गोल्ड लोनच्या माध्यमातून सुमारे ६०० कोटींचे कर्ज वितरीत केले आहे. समताची सभासद संख्या एक लाखाहून अधिक ग्राहक सभासद या संस्थेशी जोडलेली आहे. अशा या पतसंस्थेच्या शिर्डी शाखेत भोंदू अशोक खरात याची वारसदार असलेली १०० हून अधिक खाती आढळली. या खात्यांवर ७० कोटींपेक्षाचा अधिक आर्थिक व्यवहार झाला आहे. हा पैसा हवाला किंवा मनी लॉन्ड्रिंगसाठी वापरला गेल्याचा संशय आहे.

नराधम आजोबाचा ३ वर्षाच्या नातीवर अत्याचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बीड : पुण्यातील नसरापूर गावात ६५ वर्षाच्या नराधमाने साडेतीन वर्षाच्या मुलीवर अत्याचार करून हत्या केल्याची घटना ताजी असतानाच, आता बीडच्या केज तालुक्यातही अशाच एका संतापजनक घटनेने महाराष्ट्र हादरला आहे.

रक्ताच्या नात्याला कलंक लावत बीडमध्ये ५० वर्षीय आजोबाने आपल्या ३ वर्षांच्या चिमुकल्या नातीवर अत्याचार केला. केज तालुक्यात ही संतापजनक घटना घडली असून आरोपीला युसुफवडगाव पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात एक विवाहित तरुणी आपल्या ३ वर्षांच्या चिमुकलीसह माहेरी आली होती. १६ ते २५ एप्रिल दरम्यान संधी साधून या तरुणीच्या वडिलांनी (मुलीच्या आजोबाने) स्वतःच्याच ३ वर्षाच्या नातीवर अत्याचार केला.

या कृत्यानंतर चिमुकलीला त्रास होऊ लागल्याने तिने हा प्रकार आपल्या आईला सांगितला. आपल्याच वडिलांनी पोटच्या नातीसोबत असे घृणास्पद कृत्य केल्याचे ऐकून आईला मोठा धक्का बसला. पीडित मुलीच्या आईने तातडीने युसुफवडगाव पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी नराधम आजोबाविरुद्ध पोक्सो (POCSO) कायद्याच्या कलम ४ आणि ६ नुसार गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल **(पान ४ वर)**

भीमाशंकर अभयारण्यात बुद्ध पौर्णिमेनिमित्त प्राणी गणना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

भीमाशंकर : श्री क्षेत्र भीमाशंकर अभयारण्यात बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून वन विभागाच्या वतीने प्राणी गणना मोहीम राबविण्यात आली. अभयारण्यातील नऊ पाणवठ्यांवर ही गणना करण्यात आली.

उपवनसंरक्षक केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय वन अधिकारी गवारी तसेच वनपरिक्षेत्राधिकारी रणजीत जाधव यांच्या नेतृत्वाखाली वनपाल, वनरक्षक, वन्यजीव अभ्यासक आणि सुमारे २५ निसर्गप्रेमींनी या मोहिमेत सहभाग घेतला. प्रत्येक पाणवठ्यावर मचान उभारून रात्रीभर निरीक्षण करण्यात आले. चांदण्याच्या प्रकाशात

शांत जंगल, रातकिड्यांचा आवाज, विविध पक्ष्यांचे स्वर आणि दबक्या पावलांनी पाणवठ्याकडे येणारे वन्यप्राणी असा रोमांचकारी अनुभव यावेळी सहभागींच्या वाट्याला आला. गणनेदरम्यान सांबर, भेकर, रानडुक्कर, ससा, रानमांजर आदी प्राणी प्रत्यक्ष दिसून आले. मात्र कोणत्याही पाणवठ्यावर **(पान ४ वर)**

लोकजागरणाने समाज सशक्त केला : मुख्यमंत्री फडणवीस

राजकीय दिग्गजांच्या उपस्थितीत इंदोरीकर महाराजांच्या कन्येचा विवाह

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या कन्या ज्ञानेश्वरी आणि उद्योजक सुनील विष्णू चिलप यांचे चिरंजीव साहिल यांचा विवाह सोहळा संगमनेरमधील गुंजाळवाडी येथे अत्यंत शाही थाटात संपन्न झाला. राज्याच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांच्या उपस्थितीने या सोहळ्याची चर्चा सर्वत्र रंगली होती.

विवाहापूर्वी गगनगिरी महाराज सप्ताहाच्या ध्वजारोहण आणि कीर्तनपुष्पाने सोहळ्याला अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंदोरीकर महाराजांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, महाराजांनी लोकजागरणाच्या माध्यमातून समाजात एक सशक्त विचारांची पिढी तयार केली असून, समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. वधु-वरांना शुभेच्छा देत त्यांनी या सोहळ्याला उपस्थिती लावली.

या सोहळ्याला राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, खासदार राजन विचारे, राजाभाऊ वाझे, भाऊसाहेब वाकचौरे, आमदार श्वेता महाले, सत्यजित तांबे, विवेक कोल्हे, शरद सोनवणे, किरण लहामटे, अमोल खताळ यांच्यासह अनेक मान्यवर व लोकप्रतिनिधींनी हजेरी लावली होती.

स्वागतावरून रंगली चढाओढ

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आगमन होताच स्वागतासाठी अपक्ष आमदार सत्यजित तांबे आणि शिंदेसेनेचे आमदार अमोल खताळ यांच्या समर्थकांमध्ये चढाओढ दिसून आली. यावेळी कार्यकर्त्यांना पोलिसांनी रोखल्यामुळे आमदार अमोल खताळ यांनी संताप व्यक्त केला, ज्यामुळे सोहळ्याच्या ठिकाणी काही काळ राजकीय चर्चेचे वातावरण राहिले.

संपादकीय

संतपरंपरेचा विसर आणि 'भोंदूगिरी'चा बाजार !

''महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र, म्हणजे थोर, निर्दोष, सगुण, सात्विक, तेथे अनाचाराची बुद्धी न उपजे, आपण अनाचार ना करी आणिकासी करू न देई.''

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे शिष्य गुर्जर शिवबास यांनी बाराव्या शतकात महाराष्ट्राची जी महती वर्णिली, ती वाचताना आजच्या २१ व्या शतकातील स्थिती पाहता काळजाला पीळ पडतो. आपण नक्की कुठे चुकलो? आपण कोणत्या वाटेवर निघालो आहोत? संतांची भूमी म्हणून मिरवणाऱ्या या महाराष्ट्रात आज 'भोंदूगिरी'चे पेव फुटले आहे आणि त्याहीपेक्षा धक्कादायक म्हणजे, या भोंदूगिरीच्या पायाशी नतमस्तक होणारा वर्ग हा 'सुशिक्षित' आणि 'प्रस्थापित' आहे. अशोक खरातसारख्या भोंदू बाबांच्या प्रकरणात समोर आलेली माहिती केवळ धक्कादायक नाही, तर ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक अधोगतीची द्योतक आहे. ज्या महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'तून विश्वकल्याणाचा मार्ग दाखवला, संत तुकोबांनी 'जे का रंजले गांजले' हा साधू ओळखण्याचा निकष लावला, संत सावता माळ्यांनी कर्मातच ईश्वर पाहिला, त्या महाराष्ट्राला आज हे काय झाले आहे? संतांनी अध्यात्माची सांगड दैनंदिन विहित कर्माशी आणि सामाजिक समतेशी घातली होती. मात्र, आजच्या तथाकथित महाराज आणि बाबांनी अध्यात्माचे रूपांतर एका 'धंद्यात' केले आहे. 'ह.भ.प.' (हरिभक्त पारायण) ही पदवी आज इतकी स्वस्त झाली आहे की, तिचा वापर करून कोणीही, कुठलाही विकृत माणूस आपल्या वासनापूर्तीचे साम्राज्य उभा करू शकतो.

खरात असो किंवा पारनेरमधील यशवंत थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ, या सगळ्या प्रकरणांतून एकच सत्य समोर येते, ते म्हणजे या भोंदूबाबांनी रचलेले एक नियोजनबद्ध 'जाळे'. अनेकदा आपण बुवाबाजीला अडाणी लोकांचा प्रांत मानतो. पण, जेव्हा वरिष्ठ अधिकारी, राजकीय नेते आणि सुशिक्षित वर्ग या भोंदूंच्या चरणी लोटांगण घालताना दिसतो, तेव्हा प्रश्न पडतो की, आपले शिक्षण आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोन द्यायला कमी पडले की आपण व्यवस्थेच्या रेट्यात इतके हतबल झालो आहोत की, आता आपल्याला कशाचाही आधार हवा आहे?

कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या साध्या पण प्रभावी भाषेत सांगितले होते, ''नको नको ज्योतिषा, माझ्या दारी नको येऊ... बापा नको मारू थापा!'' आज ज्यांना आपण 'सुशिक्षित' म्हणतो, त्यांना कळत नाही, पण त्या काळातील निरक्षर बहिणाबाईंना 'नशिबाचे खेळ' उमजले होते. सुशिक्षित वर्गाने या बुवाबाजांच्या नादी लागण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्या आयुष्यातील असुरक्षितता आणि शॉर्टकटने यश मिळवण्याची लालसा. ''तुमच्या समस्या एका पूजेत सुटतील'' ही थाप जेव्हा एखाद्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याला किंवा मंत्र्याला दिली जाते, तेव्हा त्याच्यातील विवेकाचा दिवा विझलेला असतो.

या भोंदूगिरीच्या बाजारात राजकारणी आणि प्रशासन यांची भूमिका अत्यंत संशयास्पद आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी एखाद्या भोंदूच्या संस्थानाला वळवले जाते, ही बाब प्रशासन आणि राजकारण्यांच्या मिलीभगतितूनच शक्य आहे. जेव्हा सत्तेतील लोक या अशा बुवांच्या पायावर डोके ठेवतात, तेव्हा समाजात एक चुकीचा संदेश जातो. ''अमुक साहेबांनी नमस्कार केलाय, मग बाबा नक्कीच मोठे असतील,'' हा तर्क सामान्य जनतेला अशा भोंदूंच्या दारात ओढून नेतो. महिला आयोगाच्या अध्यक्षांसारख्या जबाबदार पदावर बसलेल्या व्यक्तीने, आपण वारकरी संप्रदायातील असल्यामुळे भोंदूंकडे जात होतो, असे विधान करणे म्हणजे वारकरी परंपरेचा अवमान आहे. तुकोबांनी ज्या ढोंगीपणाचा धिक्कार केला, त्याच ढोंगीपणाच्या पाठीशी वारकरी संप्रदायाचे नाव घेणे हे मोठे दुर्दैव आहे.

संस्थात्मक पातळीवरही आता धोक्याची घंटा वाजली आहे. अनेकजण 'वारकरी शिक्षण संस्था' स्थापन करून, कीर्तनाचे ढाल करून स्वतःची दुकाने चालवत आहेत. अशा वेळी, खरे वारकरी आणि ढोंगी भोंदू यांमधील फरक ओळखण्याची वेळ आली आहे. समर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे, ''अभ्यासोनी प्रकटावे, नाही तरी झाकोनी असावे.'' पण आज पोपटपंची करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. समाजाने प्रश्न विचारायला शिकले पाहिजे. कीर्तनात प्रश्नोत्तरांचे सत्र असावे, ज्यामुळे अशा अर्धवट ज्ञानी बुवांचे बिंग फुटेल.

जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात असूनही जर ही प्रकरणे बाहेर येत असतील, तर सरकारच्या यंत्रणेत नक्कीच काहीतरी त्रुटी आहे. सरकार केवळ कायदे करून मोकळे होत नाही, तर समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार करणे ही राज्यघटनेने दिलेली जबाबदारी आहे. दुर्दैवाने, अनेक मराठी वृत्तवाहिन्या आजही राशीभविष्य आणि ज्योतिष सांगून लोकांचा वैज्ञानिक दृष्टिकोन बोथट करण्याचे काम करत आहेत. हे सगळं थांबवायचे असेल, तर केवळ कायद्याची भीती पुरेशी नाही, तर समाजात एक व्यापक वैचारिक आंदोलन उभे राहायला हवे.

शेवटी, 'महाराज' किंवा 'बुवा' होण्यासाठी भगवे वस्त्र पुरेसे नाही. भगवा हा त्यागाचे प्रतीक आहे, विकृतीचे नाही. समाजातील सुशिक्षित वर्गाने आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनी हे ध्यानात ठेवावे की, तुम्ही ज्या बुवांच्या पायावर नतमस्तक होता, तो माणूस तुमच्या ज्ञानापेक्षा, कर्तृत्वापेक्षा आणि अधिकारापेक्षा कितीतरी पटीने लहान आहे. स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा, कर्मकांडात भविष्य शोधू नका.

महाराष्ट्राला पुन्हा एकदा त्या संतांच्या विचारांची गरज आहे, ज्यांनी 'देव' कुठे आहे हे सांगताना 'रंजल्या-गांजल्यात' देव पाहिला. जोपर्यंत आपण हा विवेक जागा करणार नाही, तोपर्यंत महाराष्ट्रातील ही भोंदूगिरीची कीड संपणार नाही. भोंदू खरात प्रकरणाने महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर काजळी फासली आहे, ती पुसायची असेल, तर विवेकाचा आरसा पुन्हा एकदा स्वच्छ करावा लागेल. आणि हो, अनाचाराची बुद्धी रोखण्यासाठी 'बध्याची भूमिका' सोडून समाज म्हणून आपल्याला अधिक प्रखर आणि 'निर्दोष' बनावे लागेल.

ग्रामीण भागात गॅस टंचाई

ग्राहकांची पिळवणूक वाढली, प्रशासनाचे दुर्लक्ष?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

म्हैसगाव : तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये त्यामध्ये म्हैसगाव , दरडगांव थडी , कोळेवाडी , चिखलठाण , ताहाराबाद ,भागात सध्या घरगुती गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. भारत गॅस , क्ष्न ग्रॅस , इंडियन ग्रॅस एजन्सीकडून वेळेत पुरवठा होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे वितरणाचा सावळा गौंधळ सुरू झाला आहे त्यामुळे ग्रामीण भागातील महिला वर्गातून पुन्हा चुलीवर स्वयंपाक करायला सुरुवात केली आहे चूल पेटवण्यासाठी झाड लाकडांची गरज असल्यामुळे त्यामुळे गरज भागण्यासाठी झाडे कामी झाल्यामुळे राहिलेले झाडाची तोड सुरू झाली आहे व करण्यात सुरू झालेले दिसत येत आहे आहे . मिळालेल्या माहितीनुसार, अनेक

लाभार्थ्यांनी वेळेवर गॅस बुकिंग करूनही त्यांना नियोजित वेळेत सिलेंडर मिळत नाही. याउलट काही

महागाईचा भडका !

९९३ रुपयांनी महागला गॅस सिलेंडर

गॅस गाडी चालकांकडून वाढीव दराने पैसे घेऊन इतर ग्राहकांना सिलेंडर विक्री केल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. गॅस एकाच्या नावे बुक करायचा व जास्त पैसे घेऊन टाकी दुसऱ्याला द्यायची हा प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू झाला आहे या प्रकारामुळे ग्रामीण भागातील प्रामाणिक ग्राहकांना गॅससाठी प्रतीक्षा करावी लागत असून, त्यांची आर्थिक व मानसिक पिळवणूक होत आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाने या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. योग्य व पारदर्शक वितरण होत नसल्याने गॅस पुरवठा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.गॅस टाकी घरातील शोची वस्तू बनवली आहे .

दरम्यान, या प्रकरणात दंडाधिकारी यांनी तात्काळ लक्ष घालून गॅस वितरण करणाऱ्यांवर संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी व माहिलानी केली आहे. अन्यथा संतप्त महिला व नागरिक गॅस वितरण कंपनीविरोधात मोर्चा काढण्याचा इशारा देत आहेत. ग्रामीण भागातील गॅस टंचाईचा प्रश्न तातडीने सोडवून सर्वसामान्यांना न्याय मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जुन्या आठवणींचा दरवळ, नव्या संकल्पांची जोड

माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

लोणी, : शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नसून आयुष्य घडवणारे संस्कारकेंद्र असते, याची प्रचिती प्रवरानगरच्या प्रवरा पब्लिक स्कूल आणि प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात पुन्हा एकदा आली. विविध वर्षांत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि शाळेशी असलेले भावनिक नाते नव्याने दृढ केले. मेळाव्याच्या सुरुवातीलाच सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांना व शाळेला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. आज आपण जिथे आहोत, त्यामागे या शाळेचे मोठे योगदान आहे. शाळेने दिलेले संस्कार आणि शिक्षण आयुष्यभर उपयोगी पडले, असे भावनिक उद्गार अनेक माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. काही विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरचा प्रवास सांगत, शालेय शिक्षणाने मिळालेली पायाभरणी किती महत्त्वाची ठरली हे अधोरेखित केले. मेळाव्यादरम्यान शाळेतील झालेल्या प्रगतीबद्दलही माजी विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. आपली शाळा अधिक आधुनिक झाली आहे, सुविधा वाढल्या आहेत आणि विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार उपक्रम राबवले जात आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे, असे त्यांनी नमूद केले. नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी गौरविले. या वेळी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या 'सेंट्रल किचन' उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ, पौष्टिक आहार मिळत असून त्यातून स्वच्छतेची सवय, शिस्त आणि भारतीय संस्कृतीचे मूल्य रुजवले जात आहेत, असे मत माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. करत बदलत्या प्रवरा शैक्षणिक संकुलचे कौतुक केले. कार्यक्रमात विविध सांस्कृतिक सादरीकरणे, अनुभव कथन आणि स्नेहभोजनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. जुन्या छायाचित्रांचे प्रदर्शन आणि आठवणींना उजाळा देणारे उपक्रम यामुळे वातावरण अधिकच भावनिक व उत्साही झाले. जुन्या आठवणींची ऊब आणि नव्या संकल्पांची उभारी यांचा सुंदर संगम या मेळाव्यात अनुभवायला मिळाला.प्राचार्य डॉ.बी.बी.अंबाडे, विजय आहेर आणि शिक्षणांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

धानोऱ्यात खंडोबा मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा जल्लोषात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सोनगाव : राहुरी तालुक्यातील धानोरे (पंचक्रोशी) येथे कुलदैवत खंडोबा मंदिराचा कलशारोहण, मूर्ती प्राणप्रतिष्ठा व लोकार्पण सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. या भव्य धार्मिक सोहळ्यास पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी उपस्थिती लावून दर्शनाचा लाभ घेतला. तीन दिवस संपूर्ण परिसरात सणासुदीचे आणि भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले.

कै. ह.भ.प. तुकाराम धोंडीबा शेवाळे व कै. चि. गणेश रविंद्र शेवाळे यांच्या स्मरणार्थ रविंद्र तुकाराम शेवाळे यांच्या पुढाकारातून

मंदिराची उभारणी करून ते खंडोबा चरणी अर्पण करण्यात आले. या सोहळ्यास उंबरेश्वर देवस्थान (वरवंडी) येथील महंत दत्तगिरी महाराज यांचे मार्गदर्शन लाभले. सोहळ्याची सुरुवात भव्य मिरवणुकीने झाली. तीन दिवस प्रायश्चित्त, गणपती पूजन, कुंभ पूजन, अधिवास स्थापना, हवन,

पंचक्रोशीत भक्तीचा महासागर

मूर्ती स्नपन, शांती पौष्टिक हवन आदी विविध धार्मिक विधी पार पडले. तृतीय दिवशी सकाळी विधीवत मंत्रोच्चारात कलशारोहण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर महापूजा, उत्तरांग हवन, बलिदान व पूर्णाहुतीचे विधी पार पडले. सायंकाळी शिव मल्हार जागरण गोंधळ पार्टी (वाकडी) यांचा जागरण कार्यक्रम रंगला. त्यानंतर महाप्रसाद (भंडारा) देण्यात आला.भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. या सोहळ्यासाठी ब्राह्मणवृंद म्हणून वे.शा.सं. विश्वास प्रदीप क्षीरसागर (त्र्यंबकेश्वर), वे.शा.सं. सारंग मिसाळ व वे.शा.सं. गौरव दायमा यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रविंद्र तुकाराम शेवाळे, संतोष रविंद्र शेवाळे तसेच समस्त धनेश्वर देवस्थान ट्रस्ट, वक्रतुण्ड गणेश मंडळ, भजनी मंडळ व धानोरे, सोनगाव, सात्रळ येथील ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. या धार्मिक सोहळ्यामुळे धानोरे परिसरात भक्तीभावाची उधळण झाली असून भाविकांनी समाधान व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या नूतन इमारतीचा भूमिपूजन सोहळा उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गणोरे - शिक्षणाला व ज्ञानाला खूप मोठे महत्त्व आहे. हे ज्ञान तळागाळातील आदिवासी, हरिजन, बहुजन गरिबांसाठी मिळणे गरजेचे आहे. हे रयत शिक्षण संस्थेने ओळखले आहे. रयत शिक्षण संस्थेने साडेसहा हजार वर्ग खोल्या ए आय करणार आहे. रयत शिक्षण संस्थेत सर्वच राजकीय पक्षाची जाती-धर्माची लोक काम करत आहे. राजकारण बाजूला ठेवून कर्मवीर भाऊराव पाटील, लक्ष्मीबाई, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार घेऊन रयत शिक्षण संस्था पुढे जात आहे.

रयतचा सेवक हा नऊ नऊ तास काम करत असतो. पंतप्रधान, राष्ट्रपती यापेक्षा मोठा माणूस शिक्षक असतो. हा रयतसेवकांचा सन्मान आहे. त्याग आणि समर्पण रयतसेवकापासून शिकावे. असे मत रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड भगीरथ शिंदे यांनी व्यक्त केले. ते गणोरे (ता- अकोले) येथील रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालयातील नूतन इमारतीचे भूमिपूजन सोहळा व माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्यात बोलत होते यावेळी अध्यक्षस्थानी न्यायमूर्ती चंद्रकांत दातीर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आण्णासाहेब दिवे यांनी केले.अड.भगिरथ शिंदे यांच्या शुभहस्ते कुदळी मारून नवीन इमारतीचे भुमिपुजन करण्यात आले. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाची प्रास्ताविक मुख्याध्यापक अण्णासाहेब दिवे यांनी केले गणोरे पंचक्रोशीतील विविध स्पर्धा परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या गुणवंतांचा व देणगीदारांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडके, नामदेव आंबरे, डॉ. अशोक दातीर, अप्पर जिल्हाधिकारी तुकाराम हुळहुळे शिक्षण तज्ञ संदीप वाकचौरे अभियंता सुनिल दातीर, नाशिक जिल्हा परिषदेचे वित्त व लेखा अधिकारी योगेश आंबरे, ह भ प मदन महाराज वर्पे आर्दीनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मनोज कवडे, सचिव विकासराव देशमुख, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, सहाय्यक विभागीय अधिकारी उत्तर विभाग बाबासाहेब नाईकवाडी, बिल्डिंग सुपरवायझर

गणोरे – येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन करताना रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष एडवोकेट भगीरथ शिंदे सहाय्यक विभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी व मान्यवर

राम नलगे, चेअरमन बांधकाम समिती प्रकाश निकम, सल्लागार समिती सदस्य अंबादास दातीर, मुख्याध्यापक अण्णासाहेब दिवे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष अशोक आहेर, सरपंच संतोष आंबरे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. मंगेश कडलक व गोडे मॅडम यांनी केले. तर शेवटची जेष्ठ शिक्षक आर डी भांगरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी गणोरे पंचक्रोशीतील ग्रामस्थ पालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बोपदेव घाटात जड वाहतूक बंद करण्याची जोरदार मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सुपे : पुणे-सासवड रोडवरील बोपदेव घाटामधून जड वाहतूक (हेवी वाहन) बंद करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे पुरंदर तालुकाध्यक्ष संदिप कटके पाटील यांनी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांना निवेदन देऊन तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. नुकताच घाटामध्ये ऑईल टँकर बंद पडल्याने अनेक तास वाहतूक ठप्प झाली होती, ज्यामुळे ही समस्या पुन्हा एकदा अधोरेखित झाली. बोपदेव घाट हा रस्ता अतिशय अरुंद व वळणदार असल्यामुळे जड वाहनांसाठी धोकादायक ठरत आहे. मोठ्या ट्रक, टँकर किंवा कंटेनरना घाटातील तीव्र वळणे घेणे कठीण जाते. परिणामी, अनेक वेळा ही वाहने वळणांवर अडकतात किंवा बंद पडतात, ज्यामुळे संपूर्ण वाहतूक व्यवस्था विस्कळीत होते. यामुळे नागरिकांना तासन्तास ट्रॅफिक जामचा सामना करावा लागतो. स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, रोज सकाळ आणि संध्याकाळी या घाटात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. विशेषतः एखादे जड वाहन अडकल्यास किंवा बिघडल्यास संपूर्ण मार्ग ठप्प होतो. याचा फटका शाळकरी विद्यार्थी, रुग्णवाहिका आणि कामावर जाणाऱ्या नागरिकांना बसतो. आपत्कालीन सेवांनाही वेळेत पोहोचण्यात अडचणी येतात.

वाहतूक तज्ञांचे मत आहे की, बोपदेव घाट हा प्रामुख्याने लहान वाहनांसाठी योग्य असून जड वाहनांसाठी पर्यायी मार्ग निश्चित करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. घाट परिसरात गेल्या काही महिन्यांत ट्रॅफिक कोंडीच्या घटना वाढल्या आहेत. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्या तरी ठोस उपाययोजना अद्याप झालेली नाही. त्यामुळे संताप वाढत आहे.

उपस्थित मान्यवर या वेळी पुणे जिल्हाध्यक्ष शेखर वढने, सरचिटणीस गंगाराम जगदाळे, मंडल अध्यक्ष पूर्व संजय निगडे, गिरीश जगताप, सचिनजी लंबाते, साकेत जगताप, आनंद जगताप आणि उमेश चव्हाण उपस्थित होते.

पुणे झेड पी चे स्वच्छ, स्मार्ट आणि सक्षम ग्रामविकासाकडे पाऊल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नाझरे सुपे : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पुणे जिल्ह्यातील ५ तालुक्यातील ५ ग्रामपंचायतींना आज पुणे जिल्हा परिषदेतर्फे १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ई-घंटागाड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात स्वच्छता व्यवस्थापन अधिक प्रभावी व आधुनिक पद्धतीने राबविण्यास मोठी मदत होणार आहे. कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष. विरधवल जगदाळे यांच्या हस्ते ई-घंटागाड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील,

या योजनेअंतर्गत लाभार्थी ग्रामपंचायती पुढीलप्रमाणे आहेत :

- '' ग्रामपंचायत देऊळगाव राजे, ता. दौंड
- '' ग्रामपंचायत वळती, ता. आंबेगाव
- '' ग्रामपंचायत दोंदे, ता. खेड
- '' ग्रामपंचायत आडाचीवाडी, ता. पुरंदर
- '' ग्रामपंचायत कुसुर, ता. जुन्नर

बांधकाम व आरोग्य समिती सभापती दिपाली हुलावळे, महिला व बालकल्याण समिती सभापती अंकिता पाटील, समाज कल्याण सभापती जितेंद्र बडेकर, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती अमोल नलावडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, तसेच श्रीकांत खरात,भूषण जोशी व इतर मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात कचरा संकलन व व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होऊन स्वच्छ, स्मार्ट आणि सक्षम ग्रामविकासाला चालना मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

संजीवनी ज्यु. कॉलेजचा १०० टक्के निकाल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून संजीवनी ज्युनिअर कॉलेजने यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. कॉलेजच्या कॉमर्स शाखेतील अंजली ईश्वर साळुंके हिने ९३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. कॉमर्स शाखेत ओम अजय बजाज याने ९०.५० टक्के गुणांसह द्वितीय, तर रिद्धी धनंजय रोहम हिने ८९.१७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. क्षितिजा होन हिने ८८.५०, तर विनाशा गुजराथी हिने ८५.५० टक्के गुण मिळविले. सायन्स शाखेत शौर्य संतोष थोरात याने ८६.५० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. समृद्धी विजय शेळके व वैभव नारायण लचके यांनी अनुक्रमे ८३.३३ व ८२.३३ टक्के गुण मिळवून यश संपादन केले. संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला असून नैतिक मूल्ये, शिस्त, कौशल्य विकास आणि सामाजिक जाणीव जोपासण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे संस्थेच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

नाथभक्त दिलीप महाराज वाघ यांना साई जीवन समाज भूषण पुरस्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील खडकाफाटा येथील साई ईश्वरी हॉटेलचे प्रमुख व श्री दत्त मंदिर व नवनाथ मंदिराचे निर्माते नाथभक्त दिलीप महाराज वाघ पाटील यांना त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी कार्यासाठी महाराष्ट्र साई जीवन गौरव अंतर्गत समाज भूषण पुरस्कार २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सदरचा पुरस्कार दिलीप महाराज वाघ पाटील यांना नुकताच प्रदान करण्यात आला. ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार सोहळा २०२६ शिर्डी येथील साईबाबांच्या पवित्र भूमीत शनिवारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिलीप महाराज वाघ पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांपासून शिर्डी व नेवासा तालुका परिसरात धर्म जागृतीचे व समाज हिताचे विविध उपक्रम राबविले आहेत.भाविकांसाठी उत्तम सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत तसेच गरजू नागरिक, गरीब वंचित घटक व आपत्तीग्रस्तांसाठी मदतीचा हात दिला, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक बांधिलकीला बळ प्राप्त झाले आहे. पुरस्कार प्रदान सोहळ्यावेळी मान्यवर पाहुणे सामाजिक कार्यकर्ते,भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात सुजय विखे यांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार सुजय विखे पाटील हे कार्यक्रमानिमित्त नेवासा येथे आले असता, प्रवरा नदीवरील बंधारा कृती समिती व तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

खोलेश्वर मंदिर येथे झालेल्या भेटीत प्रवरा नदीवरील सर्व बंधारे भरून देणे, रासायनिक खतांचा कृत्रिम तुटवडा दूर करणे व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. सध्या कडक उन्हाळ्यामुळे प्रवरा नदीवरील बंधाऱ्यांतील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात घटला असून तालुक्यात भीषण पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे.

त्यामुळे तातडीने सर्व बंधारे भरून शेतकरी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच ऊस लागवड, खरीपपूर्व मशागत व इतर शेतीकामांसाठी आवश्यक असलेल्या युरिया व इतर रासायनिक खतांचा तालुक्यात तुटवडा जाणवत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. कागदोपत्री खतसाठा उपलब्ध दाखवला जात असला तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना खतासाठी भटकंती करावी लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

यावर सकारात्मक प्रतिसाद देत सुजय विखे पाटील यांनी दोन्ही प्रश्नांवर लवकरच संबंधित प्रशासनाशी चर्चा करून तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावेळी शहराध्यक्ष मनोज पारखे, संजय गायके, सुनील व्यवहारे, आदिनाथ पटारे, संजय गवळी यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

द•ख•ल

बारावी परीक्षेत रामराव आदिक पब्लिक स्कूलचा निकाल १०० टक्के

श्रीरामपूर : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत अशोकनगर येथील रामराव आदिक पब्लिक स्कूलने यंदाही शंभर टक्के निकालाची गौरवास्पद परंपरा कायम राखत शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला. गुणवत्तापूर्ण शिक्षण, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे विद्यालयाने पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत ओम सुनील पाचपिंड याने८४. ६७ टक्के गुण मिळवून प्रथम, झेबा फैयाज सय्यद ७९.८३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर वैष्णवी सुरेश बुधे ७५.७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवत विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.या विद्यार्थ्यांना रेणुका लांडे, स्नेहल गवळी, हर्षदा रणच्छोड, ऋतुजा गोरे, फिजा पटेल, आश्विनी दौंड, निकिता राऊत या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे कार्यकारी विश्वस्त अविनाश आदिक, विश्वस्त अनुराधा आदिक तसेच विद्यालयाच्या सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कोतुक केले.

म्हैसगाव सोसायटीच्या चेअरमनपदी विलासराव गागरे बिनविरोध

म्हैसगाव : राहुरी तालुक्यातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या म्हैसगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी विलास गागरे पाटील, तर व्हा. चेअरमनपदी सुनिता हुलुळे यांची बिनविरोध निवड झाली. संस्थेच्या कार्यालयात मंगळवारी दुपारी चार वाजता सहाय्यक निबंधक सहकारी संस्था राहुरी तथा अध्यासी अधिकारी रावसाहेब खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पार पडली. चेअरमनपदासाठी विलास गागरे यांच्या नावाची सूचना ज्येष्ठ संचालक बाबासाहेब हुलुळे यांनी मांडली. अनुमोदन दादा बाबुराव कुटे यांनी दिले. व्हा. चेअरमनपदासाठी सुनिता हुलुळे यांच्या नावाची सूचना ज्ञानदेव माने यांनी मांडली, तर अनुमोदन जनार्दन विधाटे यांनी केले. दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक अधिकारी सोमनाथ खेडकर यांनी दोघांची बिनविरोध निवड जाहीर केली. यानंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांनी गुलाल उधळून व फटाक्यांची आतषबाजी करून स्वागत केले. यावेळी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ हुलुळे, माजी उपसभापती बापूसाहेब गागरे, उपसरपंच शिवाजी बर्डे, सचिव प्रकाशराव चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुर्गापूरच्या स्वप्नाली पानसरे व स्वप्निल गोपाळे यांचा ग्रामस्थांकडून गौरव

लोणी : कष्ट, जिद्द आणि शिक्षणाच्या जोरावर ग्रामीण भागातील युवकही मोठे यश संपादन करू शकतात, याचे प्रेरणादायी उदाहरण दुर्गापूर येथील स्वप्नाली पानसरे व स्वप्निल गोपाळे यांनी घालून दिले आहे. त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल ग्रामस्थांच्या वतीने उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला. शेतकरी कुटुंबातील स्वप्नाली पानसरे हिने सहाय्यक महसूल अधिकारी पदावर यश मिळवले, तर स्वप्निल गोपाळे यांनी पुणे विद्यापीठातून व्यवस्थापन कौशल्य विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली. साध्या कुटुंबातून पुढे येत त्यांनी मेहनत, जिद्द आणि पालकांच्या पाठबळावर हे यश मिळविल्याने ग्रामस्थांनी अभिमान व्यक्त केला. सत्कार समारंभात लोकनियुक्त सरपंच नानासाहेब पुलाटे, माजी अध्यक्ष सोपानराव पुलाटे, माजी संचालक छगनराव पुलाटे, उपसरपंच दादासाहेब मनकर, पोलिस पाटील दिलीप पुलाटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दोघांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नानासाहेब पुलाटे यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची गंगोत्री निर्माण केली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात आशुतोष पुलाटे, डॉ. सोमेश्वर मनकर, जयदीप पुलाटे आदींनी मनोगत व्यक्त केले. ग्रामस्थ, युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

द्रोणा कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

शिर्डी : राहता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. द्रोणा अकॅडमीचे अध्यक्ष जयराज दंडवते ,संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, यांनी सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. द्रोणा स्कूल व कॉलेजच्या प्राचार्या अनिता रोहोम यांनी सर्वप्रथम सरस्वती पूजन केले. व ध्वजारोहण केले. देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाचे महत्त्व सांगितले. तसेच कामगार दिनानिमित्त शाळेतील सर्व कामगारांचा यावेळी सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कामगारांच्या कष्टाचे महत्त्व अधोरेखित केले. आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकजुटीने देश व राज्याच्या प्रगतीसाठी संकल्प केला. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा देणारा ठरला.

हंडीनिमगाव त्रिवेणीश्वरच्या नदीवरील पूल होण्यासाठी युवकांचे खा. वाकचौरे यांना साकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील हंडीनिमगाव त्रिवेणीश्वर देवस्थान समोरील नदीवर पूल होण्यासाठी हंडीनिमगाव येथील तरुण मंडळातील सदस्यांनी सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब साळुंके व ग्रामपंचायत सदस्य युवा नेते किरण जाधव यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित येऊन खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना नदीवर पूल होण्यासाठी मागणीद्वारे साकडे घातले.

हंडीनिमगाव गावातील त्रिवेणीश्वर मंदिराच्या समोरील नदीवर असलेला भराव घातलेला पूल पावसाळ्यामध्ये अनेक वेळा वाहून जातो,यामुळे जाधव वस्तीकडे जाणाऱ्या लोकांचा तसेच गावातील शेतकरी व लहान मुले शाळकरी मुले अबालवृद्ध यांचा गावाशी संपर्क तुटतो गावातील लोकांना शेतात जाण्यासाठी पूर ओसरे पर्यंत वाट बघावी लागते अशी परिस्थिती व वस्तुस्थिती असल्याने युवकांच्या शिष्टमंडळाने या संदर्भात महाशिवरात्रीच्या दिवशी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना हा प्रश्न कानावर घातला होता त्यानंतर शनिवारी दि.२ मे रोजी शिर्डी येथे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या जनसंपर्क कार्यालयात जाऊन संबंधित पुलाचा प्रस्ताव तयार करण्यात यावे असे निवेदन देण्यात आले. निवेदन देतेवेळी शिवसेना शहर प्रमुख नितीन जगताप,हंडीनिमगाव सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब पाटील साळुंके, युवा नेते व ग्रामपंचायत सदस्य किरण जाधव, बाळासाहेब पिसाळ,शशिकांत चावरे,सुरेंद्र क्षीरसागर,जालिंदर भणगे,सोनू भैय्या पिटेकर, मच्छिंद्र धनवटे, किरण गरड,अरुण गरड, गणेश भणगे,कुणाल पिसाळ,बाळासाहेब जाधव,विकास महाराज जाधव यांच्यासह तरुण मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

निवेदन दिल्यानंतर तात्काळ खासदार वाकचौरे यांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी फोनवर चर्चा करून पुलाची पाहणी करण्यासाठी जाण्याचे आदेश दिले खासदार वाकचौरे यांच्या या कार्य तत्परतेमुळे युवक वर्ग आनंदी झाला व संबंधित पुलाचे काम लवकरात लवकर मार्गी लागेल अशी आशा पल्लवीत झाली.

रोहिणी आंबेकर यांना महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : शिर्डी येथे ओमसाई विकास प्रतिष्ठाण व बी.बी. सी. फिल्म प्रोडक्शन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा मानाचा महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार राहुरी येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. रोहिणी शंकर आंबेकर यांना नुकताच प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार सोहळा - २०२६ चे दिमाखदार सोहळ्यात पुरस्कार सोहळा समितीचे अध्यक्ष सुदाम संसारे, उपाध्यक्षा विद्या ठाकुर-कुंजीर, जिल्हा इमारत व इतर बांधकाम संघटनेचे सरचिटणीस नंदुजी डहाणे, वैशाली सोनवणे, उद्योजक किशोर शेठ कालडा, प्राचार्य डॉ.अरुण गायकवाड, समाजभूषण उत्तम घोगरे, ड. सतिषचंद्र सुद्रिक, दिलीप वाघ, सुमनताई देसाई, लतेश्वरी काळे, सुरज कालडा, डॉ.सुरेश गुहवे, डॉ.जितेंद्र पाटील, कार्याध्यक्ष राजेश काळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सदर पुरस्कार प्राप्त करण्यात आला. यावेळी राहुरी तालुका बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब जगधने, अनिल हापसे, प्रकाश आंबेकर, प्रवीण कांबळे, आकाश वायाळ, ओंकार वायळ, फारुख शेख, दादा तिजोरे आदी उपस्थित होते. रोहिणी शंकर आंबेकर यांनी जिल्हा परिषदेच्या बारागाव नांदूर गटात बांधकाम कामगारांच्या विविध प्रकारच्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम केले आहे. त्यांच्या या विशेष कार्याची दखल घेऊन त्यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

माजी विद्यार्थ्याकडून शाळेला AI इंटरॅक्टिव्ह बोर्ड भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कारवाडी (मालुंजे खुर्द) येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला माजी विद्यार्थी तथा पुणे येथील उद्योजक दिगंबर झारेकर यांनी CSR फंडातून ७५ इंचचे अत्याधुनिक AI इंटरॅक्टिव्ह ७ बोर्ड भेट दिले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ही मदत करण्यात आली. या बोर्डच्या हस्तांतरणाचा कार्यक्रम शनिवारी (२ मे) सकाळी अकरा वाजता राहुरी येथील सौ. भागीरथीबाई विद्यालयात झाला. यावेळी माजी खासदार प्रसाद तनपुरे यांच्या हस्ते झारेकर यांचा सत्कार करण्यात आला. तनपुरे यांनी झारेकर यांच्या उपक्रमाचे कौतुक करत ग्रामीण शिक्षणाच्या उन्नतीसाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार प्रसाद तनपुरे, उद्योजक दिगंबर झारेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब लोखंडे, सदस्य डॉ. सर्जे राव सोळुंके, पत्रकार आयुब पठाण, बाळासाहेब रासने, कारवाडी विद्यालयाचे प्राचार्य प्रदीप तनपुरे, प्रा. कैलास शेटे, बाळासाहेब राऊत, सुधीर खजिनदार, अर्जुन वाणी, संजय कारंजकर, प्रा. सारंग पोतदार, प्रा. हरिदास जगधने, सौ. ज्योती येवले, संतोष निकम, चंद्रकांत आघाव, संजीव उदावंत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

अखेर ६० वर्षांनंतर पुणतांबा-जळगाव रस्त्याच्या खडीकरणाला मुहूर्त !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : परिसरातील ग्रामस्थांच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या पुणतांबा-जळगाव मार्गाच्या खडीकरणाला अखेर सुमारे ६० वर्षांनंतर मुहूर्त मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. अंदाजे पावणेतीन किलोमीटर लांबीच्या या रस्त्यापैकी सुमारे ३०० मीटर अंतराच्या कामास प्रारंभ झाला आहे. खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांच्या निधीतून अंदाजे १० लाख रुपये खर्चून हे काम करण्यात येत आहे.

तसेच उर्वरित निधीतून जळगाव-पुणतांबा शिवारातील उर्वरित काही भागाचेही खडीकरण करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. सध्या रस्त्यावर खडी व मुरूम टाकण्याचे काम सुरू असून ग्रामस्थांनी कामाबाबत समाधान व्यक्त केले आहे. मात्र टाकण्यात येणाऱ्या मुरूमाच्या दर्जाबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. काही ग्रामस्थांनी मुरूमाऐवजी मातीचा वापर होत असल्याची शंका व्यक्त केली आहे. कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरू नये, चांगल्या प्रतीचा मुरूम टाकून दर्जेदार काम करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कामास सुरुवात झाल्याने परिसरातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

सालबर्डी सिनेमातील कलाकार ज्ञानेश्वर थोटे यांचा सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सोनई : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जनकल्याण फाउंडेशन गोंडेगाव. तालुका नेवासा यांच्या वतीने कवी संमेलन आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य आणि दिमागदार सोहळ्याचे आयोजन पांडुरंग रोडगे यांनी केले होते. नेवासा येथील हरहुन्नरी कलाकार ज्ञानेश्वर थोटे यांचा सत्कार अहिल्यानगर चे ज्येष्ठ साहित्यिक, व्याख्याते सुभाष सोनवणे आणि बाबा आरगडे यांचे हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कवियत्री ह. भ. प. सुनिता वाळुंज यांनी भूषविले. याप्रसंगी व्यासपीठावर कवी आनंदा साळवे अशोक नगर, कवी रज्जाक शेख श्रीरामपूर यांचे सह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर व्यक्तींची उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना ज्ञानेश्वर थोटे यांनी सांगितले.

की मला कॉलेज जीवनापासूनच अभिनयाची आवड असल्यामुळे मी आजपर्यंत अनेक लघुपट वेब सिरीज मध्ये काम केलेले आहे. माझी जिद्द आणि चिकाटी मुळेच मला आज सालबर्डी सारख्या दर्जे दार चित्रपटामध्ये काम करण्याची संधी मिळाली. आणि २०२६ मध्ये माझे या व्यतिरिक्त तीन मराठी चित्रपट प्रदर्शित होत आहे या सर्व यशाचे श्रेय त्यांनी आपली पत्नी राधिका थोटे यांना दिले आहे. त्यांची खंबीर साथ असल्यामुळेच इथपर्यंत पोहोचू शकल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळातही अशाच नवनवीन कलाकृतींच्या माध्यमातून लोकांचे मनोरंजन करण्याचा आणि आपल्या नेवासा गावचे नाव मोठे करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

खुपटी सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत गोरक्षनाथ तनपुरे विजयी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या खुपटी गावातील सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत सामाजिक व सुंदर गाव योजनेतील कामामुळे व सामान्य जनतेच्या विश्वासामुळे गोरक्षनाथ फक्कडराव तनपुरे हे विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार भीमराज गोरक्षनाथ कारले यांचा गोरक्षनाथ तनपुरे यांनी १८८ मतांनी पराभव केला.

जनतेचा गोरक्षनाथ तनपुरे यांच्यावर असलेला विश्वास कामाची पावती व लाडक्या बहिणींचा आशीर्वाद यामुळे ते विजयी झाले असल्याची चर्चा गावामध्ये होती गोरक्षनाथ तनपुरे यांच्या समर्थकांनी प्रत्यक्ष त्यांचे चिन्ह असलेल्या रोड रोलर वरती बसून मिरवणूक काढत गुलालाची उधळण व जल्लोष करत आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी खुपटी गावाचा विकासासाठी विकासाभिमुख काम करण्याचा व सर्वांना बरोबर घेऊन गावाचा विकास करणार असा निर्धार सरपंच गोरक्षनाथ तनपुरे यांनी यावेळी झालेल्या विजयी सभेप्रसंगी बोलतांना व्यक्त केला.

आपल्या अडीअडचणी व गावच्या विकासासाठी गरजेचे असलेले कामे नागरिकांनी सुचवावे तसेच विरोधकांनीही संकोच न बाळगता विकासकामांसाठी एकत्र यावे आज पासून गावांमध्ये माझा कुणी विरोधक नसून प्रत्येक गावच्या नागरिकांची सेवा करणे हे माझे कर्तव्य आहे असे सरपंच गोरक्षनाथ तनपुरे यांनी सांगितले.

सरपंच गोरक्षनाथ तनपुरे यांच्या विजयासाठी माऊली कारले,सुरेश कार्ले,भानाभाऊ चौधरी, सोपानराव शिंदे, कुंडलिक गव्हाणे, प्रकाश कारले, दिगंबर कारले, सुनील गव्हाणे, किशोर कुऱ्हे, सचिन शिंदे, प्रकाश शिंदे, रामदास सकट, फिलिप घोरपडे, विलास घोरपडे, जगदीश चौधरी, प्रविण कुऱ्हे, दादा वरुडे, संजय घोरपडे, संतोष कांबळे पिंटू कापसे, अशोक बर्डे यांनी विशेष प्रयत्न केले व विजयश्री खेचून आणली.

काव्य मैफिलीच्या कार्यक्रमाने कोपरगावच्या सांस्कृतिक इतिहासात जोडले गेले नवे पान : आ. काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत कोपरगाव शहरातील कृष्णाई मंगल कार्यालय येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या बहारदार काव्य मैफिलीने कोपरगावच्या सांस्कृतिक इतिहासात नवे पान जोडले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी भाषा समितीचे अध्यक्ष तथा आमदार आशुतोष काळे यांनी केले. शनिवार (दि.२) रोजी झालेल्या या कार्यक्रमाला साहित्य रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संजय केणेकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी आमदार प्रा. रमेश बोरनारे प्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक साहित्यिक राजेंद्र कोयटे यांनी केले. वैशाखाच्या उकाड्यात कवितेच्या गारव्याचा अनुभव घेण्यासाठी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. यावेळी बोलतांना महाराष्ट्र राज्य मराठी भाषा समितीचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे म्हणाले की, महाराष्ट्र दिन हा केवळ उत्सव नसून आपल्या मराठी भाषेचा आणि संस्कृतीचा अभिमान व्यक्त करण्याचा दिवस आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी भाषा समितीचे अध्यक्ष या नात्याने मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करणे ही माझी प्राथमिक जबाबदारी आहे. कविता आणि साहित्य हे समाजाचे जिवंत प्रतिबिंब आहे. बदलत्या काळातही साहित्याची ही परंपरा जपणे अत्यंत गरजेचे असून मराठी भाषेची समृद्धी टिकवण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत आवश्यकता आहे.

कोपरगावसारख्या शहरात अशा काव्य मैफलींचे आयोजन करून साहित्याची गोडी नव्या पिढीत रुजवण्याचा प्रयत्न असून नवोदित कवींना व्यासपीठ मिळावे, तसेच रसिकांमध्ये वाचन आणि लेखनाची आवड निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू आहे. या बहारदार काव्य मैफलीच्या माध्यमातून कोपरगावच्या सांस्कृतिक जीवनात एक नवा रंग भरला आहे. या काव्य मैफलीत कवी आबेद शेख, आबासाहेब पाटील, गुंजन पाटील, नितीन चंदनशिवे, रमजान मुल्ला, लता एवळे, संदीप काळे, शशिकांत शिंदे, तालिब सोलापुरी आदी नामवंत कवींनी प्रेम, सामाजिक वास्तव, निसर्ग, विनोद व जीवनातील विविध भावछटा कवितांतून उलगडल्या. सूत्रसंचालन इंद्रजीत घुले यांनी काव्यमय शैलीत केले. प्रत्येक सादरीकरणाला टाळ्यांचा कडकडाट झाला.

आमदार आशुतोष काळे म्हणाले, मराठी भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. नवोदित कवींना व्यासपीठ मिळावे व नव्या पिढीत वाचनाची आवड निर्माण व्हावी, हा या कार्यक्रमामागील हेतू आहे. यावेळी कवी, लेखक, पत्रकार व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

नराधम आजोबाचा ३ वर्षाच्या नातीवर अत्याचार

होताच 'पिंक पथका'चे पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके यांनी तात्काळ आरोपी आजोबाला बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीला न्यायालयात हजर करण्यात येणार असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. भोर, चाकण आणि आता बीडमध्ये घडलेल्या अत्याचारच्या या घटनांमुळे महाराष्ट्रात संतापाचे वातावरण आहे. कठोर कायद्यांची मागणी केली जात आहे.

भीमाशंकर अभयारण्यात बुद्ध पौर्णिमेनिमित्त प्राणी गणना

बिबट्याचे दर्शन झाले नाही.भीमाशंकर अभयारण्य घाटमाथ्यावर असल्याने धुक्याचे लोट, थंडगार वारे आणि कठीण भौगोलिक परिस्थितीमुळे निरीक्षणात काही अडचणी आल्या. जंगलात अनेक ठिकाणी पाण्याची उपलब्धता असल्याने पाणवठ्यांवर प्राण्यांची संख्या तुलनेने कमी दिसून आली.
रात्रभर शांतपणे मचानावर बसून वन्यजीवांचे निरीक्षण करण्याचा आगळावेगळा अनुभव सर्व सहभागी निसर्गप्रेमींना मिळाला.

प्राजक्त तनपुरे यांनी स्वखर्चाने डीपी बसवून घोरपडवाडी गावाला काढले अंधारातून बाहेर !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी तालुक्यातील घोरपडवाडी येथे गावठाणातील वीज वितरणासाठी असलेली डीपी (डिस्ट्रिब्युशन पॉईंट) जळाल्याने संपूर्ण गाव अंधारात गेले होते. महावितरणच्या सुरू असलेल्या संपामुळे डीपी त्वरित मिळण्याची शक्यता नसताना, स्थानिक पातळीवर पुढाकार घेत माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अवघ्या काही तासांत स्वखर्चातून नवीन डीपी उपलब्ध करून देत गावकऱ्यांना दिलासा दिला.

दि. २७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास घोरपडवाडीतील गावठाण डीपी जळाली. याबाबत महावितरण अधिकाऱ्यांना माहिती दिल्यानंतर त्यांनी संप सुरू असल्याने डीपी मिळण्यासाठी किमान दोन ते तीन दिवस लागतील, असे स्पष्ट केले. त्यामुळे आधीच अंधारात असलेल्या गावाची अडचण आणखी वाढली. घोरपडवाडी हे गाव जंगला लगत असल्याने परिसरात बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे रात्रीच्या

अंधारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर दि. २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता गावातील गोविंद शेंडगे व अशोक शेंडगे यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. त्यावर त्यांनी तातडीने प्रतिसाद देत, महावितरणचा संप सुरू असल्याने अधिकृतरीत्या डीपी मिळण्यास विलंब होईल. मात्र काळजी करू नका, आजच माझ्या स्वखर्चातून डीपी उपलब्ध करून देतो, असे आश्वासन दिले. त्यांनी आपल्या कारखान्याच्या वाहनातून आवश्यक डीपी घोरपडवाडीत पाठवून तातडीने बसवण्याची व्यवस्था केली. संबंधित कामगारांची टीमही त्यांनीच उपलब्ध करून दिली. परिणामी, अवघ्या तीन तासांत डीपी बसवून गावातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या या तत्पर आणि मदतीच्या भूमिकेमुळे घोरपडवाडी गाव पुन्हा प्रकाशात आले असून, ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत.

निधन वार्ता

शांताबाई टेकाडे

बेलापूर : येथील जुन्या पिढीतील सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील कार्यकर्त्या श्रीमती शांताबाई गणपतराव टेकाडे (वय -९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली,सुना, जावई, नातु, पणतु असा मोठा परिवार आहे.सर्वश्री कृषी व्यावसायिक बाळासाहेब, भाजीपाला आदतदार राजेंद्र व कृषी सहाय्यक संजय टेकाडे यांचे ते वडील होते.

सिस्टर शालिनी साळवे

शिरसगाव : हरीगाव येथील संत तेरेजा बॉईज हायस्कुल व गर्ल्स हायस्कुल येथे शिक्षिकेचे ४० वर्ष उल्लेखनीय कार्य केलेल्या सिस्टर शालिनी साळवे (वय ८७) यांचे दुःखद निधन झाले. हरीगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी नासिक धर्मप्रांत महागुरुस्वामी बार्थोल बरेटो, प्रमुख धर्मगुरू रे फा डॉमनिक रोझारिओ, फा फ्रान्सिस ओहोळ, फा संतान रॉड्रिग्ज, ब्र.मॅक्सवेल,मुख्याध्यापिका ज्योती गजभिव व सर्व सिस्टर्स,ज्यो दिवे,सुभाष पंडित यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

'शिक्षक भारती'च्या जिल्हा समन्वयकपदी प्रा. ॲड. शरद पवार

अहिल्यानगर: शिक्षकांच्या न्याय्य हक्कासाठी लढा देणारी राज्यस्तरीय संघटना 'शिक्षक भारती'च्या अहिल्यानगर जिल्हा समन्वयक (माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग) पदी प्रा. ॲड. शरद सुभाष पवार यांची निवड करण्यात आली आहे. २०२६ ते २०२९ या कार्यकाळासाठी त्यांना पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी अधिकृत नियुक्ती पत्र प्रदान केले.

प्रा. ॲड. शरद पवार हे उच्चशिक्षित असून त्यांनी एम.ए., बी.एड., सेट, नेट, टेट, सीटीईटी आणि एलएलबी अशा विविध शैक्षणिक पदव्या संपादन केल्या आहेत. ते सध्या भाग्योदय विद्यालय (भोयरे पठार) व भाई सथ्था नाईट हायस्कूल येथे कार्यरत आहेत. त्यांच्या प्रगल्भ शैक्षणिक आणि कायदेशीर ज्ञानाचा उपयोग जिल्ह्यातील शिक्षक बांधवांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी मोलाचा ठरेल, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.

जिल्हास्तरावर संघटना बांधणी अधिक मजबूत करणे, संघटनेचा प्रसार करणे आणि लोकशाही व विज्ञानभिमुख समाजरचनेसाठी कार्य करणे, ही त्यांची प्रमुख जबाबदारी असेल. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील शिक्षक चळवळीला एक अभ्यासू व धडाडीचे नेतृत्व मिळाल्याची भावना शिक्षक वर्गातून व्यक्त होत आहे.

या नियुक्तीबद्दल शिक्षक भारतीचे संस्थापक आमदार कपिल पाटील, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, अध्यक्ष अशोक बेलसरे, जयवंत भाबड, महेश पाडेकर, रूपालीताई बोरुडे आणि जिल्ह्यातील पदाधिकारी व शिक्षक बांधवांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

गोसंवर्धनासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

पुणे : महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत गोसंवर्धनासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेखर मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली आयोगाच्या कामकाजाला विशेष गती प्राप्त झाली आहे.

राज्यातील ६५० हून अधिक गोशाळांना भेटी देऊन तसेच १००० पेक्षा अधिक गोपालक, शेतकरी व संबंधित संस्थांशी संवाद साधत विविध प्रश्नांच्या निराकरणासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. सन २०२५-२६ या वर्षासाठी देशी गाईंच्या संगोपनासाठी प्रती गाय प्रतिदिन ५० रुपये अनुदान योजना सुरू करण्यात आली असून, या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली आहे. 'सेव्ह द काऊ' उपक्रमांतर्गत ५,५०० हून अधिक गाईंचे संरक्षण करण्यात आले आहे.

तसेच सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर गोमयापासून तयार करण्यात येणारे दिवे, मूर्ती, साबण यांसारख्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देत ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे कार्य करण्यात येत आहे. याशिवाय, गोमय उत्पादने, ई-गोकट्टा उपक्रम, अधिकृत संकेतस्थळ यांसारख्या माध्यमांतून गोसंरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत असून आयोगाचे कामकाज अधिक पारदर्शक व गतिमान करण्यात आले आहे. राज्यातील गोवंश संरक्षणासाठी आयोग कटिबद्ध असल्याचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी सांगितले.

व्यापाऱ्यांच्या हक्कांसाठी भाजपा व्यापारी आघाडीचा ठाम आवाज

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

पुणे : शहरातील व्यापाऱ्यांकडून सातत्याने प्राप्त होत असलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी, व्यापारी आघाडी – पुणे शहराचे अध्यक्ष महेश गुप्ता यांनी पुढाकार घेत पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना निवेदन सादर केले. व्यापाऱ्यांना कायदेशीररित्या २४ तास व्यवसाय करता यावा, यासाठी हे निवेदन देण्यात आले. निवेदनात महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नियमन) अधिनियम, २०१७ तसेच महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १ ऑक्टोबर २०२५ च्या परिपत्रकानुसार आवश्यक परवाने असलेल्या व कायदेशीर व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांना २४ तास सुरू ठेवण्याचा अधिकार असल्याचे नमूद करण्यात आले. मात्र काही ठिकाणी स्थानिक स्तरावर अशा वैध आस्थापनांवर अनावश्यक निर्बंध लादले जात असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला. तसेच बॉम्बे उच्च न्यायालयाच्या आदेशाचाही उल्लेख करत अशा प्रकारचे निर्बंध कायद्याच्या विरोधात असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

सरस्वती इंटरनॅशनल स्कूलचा १२ वीचा निकाल १०० टक्के

वडाळा महादेव : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (कड.उ.) बोर्ड परीक्षेच्या निकालात भैरवनाथनगर येथील सरस्वती इंटरनॅशनल स्कूल आणि ज्युनियर कॉलेजने यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाच्या या दैदीप्यमान यशात रेहान अश्पाक पठाण याने ८६.५०% गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. तसेच हृषीकेश अशोक भांड याने ८१.५०% गुणांसह द्वितीय, तर श्रुती सुनील लांडे आणि सिद्धी मुकुंद कालांगडे या दोघींनी ७८.१७% समान गुण मिळवून संयुक्तपणे तृतीय क्रमांक पटकावला आहे.

हे यश केवळ गुणांपुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांचे समर्पण, चिकाटी आणि कठोर परिश्रमाचे फळ असल्याचे मत शिक्षण संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन विरेश अंबादास लबडे व व्हा. चेअरमन विद्या विरेश लबडे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांचे कौतुक केले. विद्यालयाचे प्राचार्य अर्जुन कासार आणि उपप्राचार्य मोहित साळुंके यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. स्वतःवर विश्वास ठेवून उत्कृष्टतेसाठी सातत्याने प्रयत्न करत राहा असा संदेशही यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला. विद्यालयाच्या या यशामुळे भैरवनाथनगर परिसरातून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवर पारगाव पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

पारगाव (ता. आंबेगाव) : परिसरात मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांविरोधात पारगाव पोलिसांकडून अलीकडे कठोर कारवाई करण्यात येत आहे. रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वाची मानली जात असून, अनेक वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. मात्र, याच वेळी परिसरात अवैधरित्या मद्य विक्री करणाऱ्यांवर अपेक्षित ती कारवाई होत नसल्याचे चित्र दिसत आहे. काही ठिकाणी उघडपणे बेकायदेशीर मद्य विक्री सुरू असल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून केल्या जात आहेत. त्यामुळे एकीकडे कारवाई, तर दुसरीकडे दुर्लक्ष अशी दुहेरी भूमिका पोलिसांकडून घेतली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. स्थानिक

नागरिकांच्या मते, जर अवैध मद्य विक्रीवर प्रभावी नियंत्रण ठेवले गेले, तर मद्यप्राशन करून वाहन चालवण्याच्या घटनांनाही आळा बसेल. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. दरम्यान, पारगाव पोलिसांनी या संदर्भात अधिक तपास सुरू असल्याचे सांगितले असून, अवैध मद्य विक्री करणाऱ्यांवरही लवकरच कारवाई केली जाईल, असे संकेत दिले आहेत सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी काही दिवसांपूर्वी पारगाव पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारला असून, त्यांच्या नियुक्तीनंतर स्थानिक पातळीवर मोठ्या अपेक्षा व्यक्त होत आहेत. विशेषतः पारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर, तसेच चोरून होणाऱ्या वाळू उपशावर कठोर कारवाई होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. गेल्या काही काळात या भागात बेकायदेशीर वाळू उत्खनन आणि इतर अवैध व्यवसाय वाढल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. त्यामुळे नवीन अधिकाऱ्यांनी या प्रकरणांकडे गांभीर्याने लक्ष देत त्वरित कारवाई करणे गरजेचे असल्याची भावना स्थानिक नागरिकांमध्ये आहे. सचिन कांडगे यांच्या कार्यपद्धतीकडून नागरिकांना सकारात्मक बदलाची अपेक्षा असून, कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील का, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

राहुरी एज्युकेशन सोसायटीच्या निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी एज्युकेशन सोसायटीच्या कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता १२ वी (क्ष्ठउ) परीक्षेचा निकाल यंदा उल्लेखनीय लागला असून विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले आहे. विद्यालयाचा ८८.५० टक्के इतका निकाल लागला आहे. विज्ञान व कला या दोन्ही शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तम गुण मिळवत महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल समाधानकारक असून सर्व शाखा मिळून एकूण १७४ विद्यार्थ्यांपैकी १५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ८८.५० टक्के इतका निकाल लागला आहे. यामुळे महाविद्यालयाचा यशाचा टक्का लक्षणीय ठरला आहे.

विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी :

पोपळघट भक्ती संजय – ८४.६७%
तनपुरे सार्थक महेश – ८४.१७%
नांदुरकर अक्षद किरण – ८२.१७%
कला शाखेतील गुणवंत विद्यार्थी :
फलके ऐश्वर्या दत्तात्रय – ७९.६७%
आवारे खुशी विल्सन – ७६.३३%
साळवे आनंदी रूपक – ६८.३३%



या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे राहुरी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षा प्रभावतीताई बिहाणी, सेक्रेटरी मनोज बिहाणी, सहसेक्रेटरी अनुप बिहाणी, प्राचार्य कैलास अनाप ,मुख्याध्यापिका मंजिरी देशपांडे, ज्येष्ठ शिक्षक राहुल जगताप तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

शिरूरला उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रिया बिरादार यांचे बेमुदत उपोषण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिरूर:- शहरातील विविध प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी भाजपा महिला आघाडीच्या शिरूर शहराध्यक्षा प्रिया बिरादार या उद्यापासून बेमुदत उपोषणास बसणार आहेत. शिरूर तहसील कार्यालयासमोर हे उपोषण सुरू होणार असून, समाजहिताच्या मागण्यांसाठी हा लढा उभारण्यात आला आहे. शहरात १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी जागेचा परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावा, चुकीचा प्रस्ताव सादर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच शहर व तालुक्यात अधिकृत शासकीय आधार केंद्रे सुरू करावीत, अशा प्रमुख मागण्या या आंदोलनातून करण्यात येत आहेत. तसेच सीएससी केंद्रांवरील शुल्काबाबत पारदर्शकता ठेवावी, बंद असलेल्या आधार केंद्रांची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कारवाई करावी, आणि प्रशासनाने या गंभीर प्रश्नांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. सोमवार, दि. ४ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिरूर तहसील कार्यालय येथे या बेमुदत उपोषणास सुरुवात होणार असून, प्रिया बिरादार यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनगणना प्रगणकांकडून नायब तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : तालुक्यातील त्रिमुर्ती संकुल येथे सुरू असलेल्या जनगणना प्रशिक्षणादरम्यान प्रगणकांनी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार राजेंद्र बकरे यांना सादर केले. या निवेदनात कमी व्हर्जनचे मोबाईल असलेल्या प्रगणकांना शासनाकडून मोबाईल किंवा टॅब उपलब्ध करून देण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच सध्या वाढत असलेल्या उन्हाच्या तीव्रतेमुळे पुढील टप्प्यातील प्रशिक्षण सकाळच्या सत्रात घेण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

नायब तहसीलदार राजेंद्र बकरे यांनी प्रगणकांच्या भावना समजून घेत त्यांच्या मागण्या वरिष्ठ कार्यालयाकडे कळविण्याचे आश्वासन दिले. यावेळी महसूल सहाय्यक सुरेश बर्डे, अमोल खरड उपस्थित होते. तसेच शिक्षक बँकेचे संचालक रमेश गोरे, नानाभाऊ शिंदे, सुनील राठोड, सुनील गोरडे, किसन राठोड, धनराज बनकर, महादेव देवढे, हरिभाऊ बडे, विष्णू वाघमारे, विष्णू भाबड, अंबादास रुईकर, भागवत घुले, संदीप बडे, बबन बर्डे, सुधीर शेळके, मनीषा वडते, अर्चना पटारे, पूनम वाघमारे, सुभाष सांबरे, संतोष येंडे यांच्यासह प्राथमिक व माध्यमिक शिक्षक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME
JUBEDABI BABULAL KHAN
(BEFORE NAME)
TO NEW NAME AS
JUBEDA GANI SAYYAD
(AADHAR NO. 2983 4222 4351)
FROM VIDE AFFIDAVIT
BEFORE NOTARY PUBLIC
PIMPRI,PUNE
PLACE: PIMPRI,PUNE
DATE : 01/05/2026

कुटे वस्ती शाळेत महाराष्ट्र दिन व नवागतांचे स्वागत उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

बालाजी देडगाव : येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुटे वस्ती येथे महाराष्ट्र दिन, इयत्ता पहिली प्रवेशोत्सव तसेच नवागतांचे स्वागत कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बन्सीतात्या कुटे होते. सुनिल गायकवाड सर यांनी महाराष्ट्र दिनाची माहिती तसेच महाराष्ट्र दिनाचा महिमा उपस्थितांना आपल्या मनोगतामधून सांगितले. ध्वजारोहना नंतर इयत्ता पहिली प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रवेशोत्सवाचे नियोजन सीमा गायकवाड मॅडम यांनी केले. विद्यार्थ्यांचे पाहिले पाऊल, तसेच विद्यार्थी स्वागत, तसेच विविध प्रकारचे स्टॉल, टेबल यात नावनोंदणी - वजन, उंची, शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक विकास, भावनात्मक विकास, भाषा विकास, गणनपुर्व तयारी असे स्टॉल मांडून नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते मिठाई भरवून प्रवेश देण्यात आला. स्टॉल कामी माजी विद्यार्थी व स्वयंसेवकांची मदत झाली.

कार्यक्रमासाठी जयहरी कुटे, सोन्याबापू कुटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष देविदास काकडे, ग्रामपंचायत सदस्य जालू मामा खांडे, शिक्षणतज्ञ चेअरमन ज्ञानदेव कदम, सदस्य अर्जुन घोडके, भानुदास कुटे, बन्सी खांडे, बारकु कोकरे, भाऊसाहेब कदम, श्याम घोडके, माजी विद्यार्थी अध्यक्ष राम कुटे, उपाध्यक्ष बबलू कुटे, संतोष कोकरे, भाऊराव खांडे, नवनाथ तिडके, जालु तिडके, अलका खांडे, वच्छला कुटे, अंगणवाडी सेविका जिजाबाई नांगरे आदी कुटे वस्ती येथील ग्रामस्थ बंधू व भगिनी मोठया संख्येने उपस्थित होते. सीमा गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

नशिबाची परिक्षा

सोमावार दि.०४ मे २०२६

मिलनम डे
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१२४ १७७ ११५ — ७-०
१९० २८० २४४
जोड ७१-४०-२६-९५-०८

कल्याण
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

२३८ ४९० ४७० — ३-१
१४६ १२८ १००
जोड ३९-८१-६२ ०४-१५

मुंबैम (मेन)
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

१४५ २३५ ५५० — ०-३
१२० ३८० ६७०
जोड ०६-१३-२९-७५-३८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
19/01/2026 to 23/01/2026	35	86	20	96	59
26/01/2026 to 30/01/2026	**	30	23	83	52
02/02/2026 to 06/02/2026	28	55	20	73	87
09/02/2026 to 13/02/2026	82	93	22	34	30
16/02/2026 to 20/02/2026	46	29	38	92	65
23/02/2026 to 27/02/2026	76	39	48	53	09
02/03/2026 to 06/03/2026	47	03	**	48	65
09/03/2026 to 13/03/2026	16	56	05	43	09
16/03/2026 to 20/03/2026	56	21	02	02	38
23/03/2026 to 27/03/2026	34	46	03	46	64
30/03/2026 to 03/04/2026	90	87	97	12	66
06/04/2026 to 10/04/2026	70	02	98	82	78
13/04/2026 to [illegible]	06	43	45	77	85
27/04/2026 to 01/05/2026	63	85	71		

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

रासायनिक खतांच्या किमती गगनाला भिडल्या

श्रीगोंद्यात सेंद्रिय शेतीकडे कल वाढला : शेणखताला आला सोन्याचा भाव!

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : जमिनीची घटती सुपीकता आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम या पार्श्वभूमीवर शेतकरीवर्ग पुन्हा पारंपरिक आणि नैसर्गिक शेती पद्धतीकडे वळताना दिसत आहे. याच बदलत्या प्रवाहामुळे शेणखताला अभूतपूर्व मागणी निर्माण झाली असून, सध्या बाजारात शेणखताला तब्बल २८०० ते ३००० रुपये प्रतिट्रॉली असा दर मिळत आहे. त्यामुळे ग् ग्रामीण भागात शेणखताला अक्षरशः सोन्याचा भाव आल्याची चर्चा रंगत आहे.

गेल्या काही वर्षांत रासायनिक खतांच्या अमाप वाढलेल्या किमती तसेच त्यांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत खालावला. तसेच उत्पादनात घट झाली आणि पिकांच्या गुणवत्तेवरही विपरित परिणाम झाला. त्यामुळे अनेक शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले. या अनुभवातून धडा घेत शेतकरी आता सेंद्रिय शेतीचा मार्ग स्वीकारत आहेत. विशेषतः येऊ घातलेल्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी मोठ्या प्रमाणात शेणखत साठवण्यावर भर देत असल्याचे दिसून येत आहे.दरम्यान, शेणखत भरण्यासाठी मजुरांची टंचाई मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने शेणखत ट्रॅक्टरमध्ये भरला जात आहे. एक ट्रॅक्टर भरण्यासाठी सुमारे ५०० रुपये आणि वाहतुकीसाठी आणखी ५०० रुपये असा खर्च येत आहे. म्हणजेच एका ट्रॉली शेणखतासाठी शेतकऱ्याला एकूण सुमारे ४००० रुपये खर्च करावा लागत आहे.याशिवाय, शेतात खत पसरवण्यासाठीही मजुरी द्यावी लागत आहे. त्यामुळे शेणखताचा एकूण खर्च शेतकऱ्यांसाठी लक्षणीय वाढलेला आहे. ग्रामीण भागात गायी-म्हशींची संख्या कमी होत चालल्यामुळे शेणखताचे उत्पादन मर्यादित झाले आहे. परिणामी, मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी पडत असून, दरात मोठी वाढ झाली आहे. अनेक शेतकरी गावोगावी जाऊन शेणखत खरेदी करताना दिसत आहेत. काही ठिकाणी तर शेणखतासाठी आगाऊ नोंदणी (बुकिंग) सुरू असून, पहिले येणाऱ्यास पहिले प्राधान्य या तत्त्वावर वितरण केले जात आहे.

मागणी वाढल्याने गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

शेणखत जेवढे जुने तेवढा शेतकऱ्यांना जास्त फायदा होतो मात्र सगळीकडेच शेणखताच्या वाढत्या मागणीमुळे शेणखताच्या गुणवत्तेवरही प्रश्न निर्माण झाला आहे. काही ठिकाणी अपूर्ण कुजलेले किंवा निकृष्ट दर्जाचे शेणखत विक्रीस येत असल्याच्या तक्रारी आहेत.त्यामुळे शेतकऱ्याला शेणखत टाकूनही उशिरा फायदा मिळत असल्याचे पाहण्यास मिळत आहे

पशुपालकांना फायदा

शेणखताच्या वाढत्या दराचा पशुपालकांनाही मोठा फायदा होत आहे. शेणखत हे आता दुय्यम नव्हे, तर महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन बनले आहे. अनेक शेतकरी आणि पशुपालक शेणखत विक्रीतून चांगले उत्पन्न मिळवत असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला यामुळे चालना मिळत आहे. तज्ज्ञांच्या मते, शेणखतामुळे जमिनीची सुपीकता वाढते, मातीचा पोत सुधारतो, पाण्याचा धरून ठेवण्याचा गुणधर्म वाढतो आणि उपयुक्त सूक्ष्मजीवांची वाढ होते. यामुळे पिकांची वाढ चांगली होऊन दीर्घकालीन उत्पादनक्षमतेत वाढ होते. हे खत आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

नवजीवन उच्च माध्य.विद्यालयाचा बारावीचा निकाल ९९.४० टक्के

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

एरडगांव : शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता बारावी (आर्ट्स, कॉमर्स व सायन्स) चा निकालात विद्यार्थानी घवघवीत यश संपादन केले असून महाविद्यालयाने यंदाही उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विशेष म्हणजे सायन्स शाखेचा निकाल ९९.४० टक्के तर कॉमर्स शाखेचा निकाल ८९.१८ टक्के तर आर्ट्स शाखेचा निकाल ७८.०९ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेमध्ये प्रथम श्रेया अशोक मांढरे, व्दितीय ज्ञानेश्वरी किसन राजळे,तृतीय समर्थ बबन जाधव,वाणिज्य शाखेत प्रथम सुजल अविनाश म ते,व्दितीय निशा विनोद रासकर,तृतीय गायत्री देविदास टाक तर कला शाखेत प्रथम रूपाली सुरेश लिंबोरे,व्दितीय भारती दिलीप जाधव,तृतीय वैष्णवी संतोष पवार या विद्यार्थानी घवघवीत यश संपादन केले आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच प्राध्यापकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा.आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील , सचिव मा. चंद्रशेखर घुले पाटील , राजश्रीताई घुले पाटील तसेच पंचायत समि तीचे सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन व समन्वयक विजय काशीद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश खैरे, पर्यवेक्षक जयराम नांगरे यांनी अभिनंदन केले आहे.

ग्रामपंचायत अधिकारी संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी कैलास तरटे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कर्जत : महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी कर्जतचे ग्रामपंचायत अधिकारी कैलास तरटे यांची निवड झाली. त्यांच्या निवडीचे कर्जत तालुक्यातून स्वागत होत आहे. तरटे यांनी यापूर्वी स्थानिक आणि जिल्हा पातळीवर विविध पदावर उत्तम कार्य पार पाडले होते. त्याच कार्याची दखल घेत त्यांना राज्य पातळीवर संधी देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघाच्या निवडी नुकत्याच पार पडल्या. यात अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जतचे ग्रामपंचायत अधिकारी कैलास तरटे यांची राज्य उपाध्यक्षपदी संधी देण्यात आली. त्यांच्या निवडीचे पत्र राज्य संघाचे राज्याध्यक्ष टी. आर. पाटील, राज्य सरचिटणीस एस. डी. पाटील, राज्य उपाध्यक्ष सागर सरावणे, राज्य प्रसिद्धीप्रमुख नवनाथ गोरे आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सुर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आले.

यावेळी अहिल्यानगर छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेचे माजी व्हाईस चेअरमन तथा विद्यमान संचालक प्रशांत सातपुते, अकोले तालुक्याचे अध्यक्ष संतोष देशमुख, साताराचे अभिजित चव्हाण यांच्यासह राज्यभरातील विविध ग्राम पंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कैलास तरटे यांच्या निवडीबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी तरटे म्हणाले की, नूतन पदाची जबाबदारी निश्चित मोठी आहे. तुमच्या सर्वांच्या सहकार्याने या पदास देखील भविष्यात न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन. यासह ग्रामविकास अधिकाऱ्यांचे जे प्रलंबित प्रश्न आहे ते शासन दरबारी मांडत मार्गी लावण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या राज्यस्तरीय निवडीबद्दल कर्जत तालुक्यातून स्वागत होत आहे.

पारगाव सुद्रिकचा द्राक्ष किंग जगतापच्या जिद्दीला बाजाराचा सलाम!

श्रीगोंदा : मागील काही वर्षापूर्वी कोरोनाचा काळ, अवकाळी पावसाचा फटका आणि बाजारभावातील घसरण अश्या तिहेरी संकटात अनेक शेतकरी अडचणीत सापडले. मात्र पारगाव सुद्रिक येथील प्रगतशील द्राक्ष बागायतदार मोहन ईश्वर जगताप यांनी जिद्द, नियोजन आणि सातत्याच्या जोरावर या संकटांवर मात करत यशाची गोड चव चाखली आहे. श्रीगोंदा तालुक्यातील पारगाव सुद्रिक हे द्राक्षाचे आगार म्हणून प्रशिद्ध आहे. मात्र कोरोनाची महामारी अवकाळी यासारख्या अनेक संकटांनी शेतकरी पुरता हताश झाला असताना पारगाव येथील मोहन जगताप यांच्या दहा ते बारा एकरांवरील द्राक्षबागेला प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी कसोशीने जपले. योग्य वेळी औषध फवारणी, तांत्रिक नियोजन आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी उत्पादन टिकवून ठेवले. परिणामी यंदाच्या हंगामात त्यांच्या द्राक्षांना सरासरी ८० ते १०५ रुपये प्रति प्लॉट दर मिळत विक्रमी उत्पन्नाची नोंद झाली आहे.मोहन जगताप यांच्या या यशस्वी वाटचालीमुळे पारगाव सुद्रिकसह परिसरात त्यांची चर्चा रंगू लागली आहे. हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

'शिक्षणामुळेच समाजाचा विकास प्रगती शक्य'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

ढोरजळगांव : विद्यार्थी कसा घडवावा हे सर्वस्वी शिक्षकाच्या हातात असते. शिक्षणामुळेच समाजाचा विकास आणि प्रगती शक्य आहे. या भागात सहकार चळवळीमुळे मोठे परिवर्तन झाले असून, नानासाहेब काटे यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन माजी आमदार तथा लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र पाटील घुले यांनी बोलताना व्यक्त केले.

शेवगाव तालुक्यातील देवटाकळी येथील जिजामाता माध्यमिक विद्यालयात ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब दत्तात्रय काटे यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा डॉ नरेंद्र घुले पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. डॉ. घुले पाटील पुढे बोलताना म्हणाले की, आजच्या धावपळीच्या युगात समाजाने तंत्रज्ञानाची साथ घेणे आवश्यक आहे. केवळ पारंपरिक पद्धतीने न थांबता, आधुनिक साधनांचा वापर करून आपण प्रगती साधली पाहिजे. सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात सातत्य असेल, तरच समाजाचा विश्वास संपादन करता येतो. युवकांनी अशा उपक्रमांतून प्रेरणा घेऊन समाजाच्या विकासाला हातभार लावावा.

संस्थेचे विश्वस्त ड. देसाई देशमुख म्हणाले की, कोणतीही संस्था जेव्हा नियम ांच्या चौकटीत राहून आणि स्पष्ट ध्येय समोर ठेवून काम करते, तेव्हा तिचे यश निश्चित असते. समाजातील अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी आणि एकोपा वाढवण्यासाठी अशा स्नेहसंमेलनांची नितांत गरज आहे. आपण सर्वांनी एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन एक भक्कम सामाजिक कवच निर्माण केले पाहिजे.सत्कारमूर्ती नानासाहेब काटे यांचा त्यांच्या पत्नीसह म ान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि सन्म ानचिन्ह देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. यावेळी हभप अशोक महाराज बोरुडे, संदिप खरड ,भाऊराव वाघमारे शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी भारत वाबळे, देवटाकळीचे सरपंच ज्ञानदेव खरड, अशोक मेरड, मुकुंद अंचवले, नानासाहेब खरड,मुसाभाई शेख,अदिनाथ खरड,बळीराम गरड,काकासाहेब घुले,जाधव सर यांच्यासह ग्रामस्थ, पालक आणि शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब मोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र शिंदे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार वाघमारे यांनी मानले.

नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडेंकडून कुरुमकर कुटुंबीयांचे सांत्वन

लिंपणगाव : श्रीगोंदा तालुक्यातील एक आदर्श माता कै. सुशिलाबाई नारायणराव कुरुमकर यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. पती कै. नारायणराव कुरुमकर यांच्या २५ वर्षांपूर्वी निधनानंतर सुशिलाबाईंनी आपल्या कुटुंब व्यवस्थेची जबाबदारी स्वीकारली. चार मुले, एक मुलगी यांना कणखरपणे आधार देत आपल्या चारही मुलांना उत्तम प्रकारे संस्काराचे धडे देत खंबीरपणे त्या उभ्या राहिल्या. त्यामुळे त्यांची चारही मुले पत्रकारिता, शैक्षणिक, बँकिंग व उद्योगांमध्ये उत्तुंग भरारी घेत आहेत. पती कै. नारायणराव कुरुमकर हे धार्मिक क्षेत्रातील बुजुर्ग सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांना बालपणा पासूनच धार्मिक क्षेत्राची आवड होती. त्यांनी आपल्या आयुष्यामध्ये लिंपणगावात प्रथम तीस वर्षांपूर्वी अखंड हरिनाम सप्ताहाची मुहूर्तमेढ रोवली. आज अखेर उत्तम प्रकारे दरवर्षी गावात अखंड हरिनाम सप्ताह चालवला जात आहे. गावात शांतता समता बंधुत्व अखंडित ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न देखील यशस्वी झाला. गावातील तरुणांना देखील कै.नारायणराव कुरुमकर यांनी धार्मिक कार्याची शिकवण व प्रेरणा दिली. त्यामुळे अनेक तरुण आज धार्मिक क्षेत्रात स्वयंस्फुर्तीने सहभागी होत आहेत. ही अभिमानाची बाब आहे. याचे सर्व श्रेय कै. नारायणराव कुरुमकर यांना जाते. यावेळी कुटुंबातील सदस्य सुभाषराव कुरुमकर, सुदामराव कुरुमकर, पत्रकार नंदकुमार कुरुमकर, राजेंद्र कुरुमकर, मुलगी कमलबाई गोलांडे आदी सह कुटुंबातील सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते.

भावी पिढीतील दृष्टीदोष दूर करा; आनंदऋषीजी नेत्रालयाचा उपक्रम : रुणवाल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णांना नवजीवन देण्याबरोबरच दृष्टीदोषामुळे अंधारलेल्या जीवनात प्रकाश आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांसाठी येथील नेत्रालय मोठा आधार ठरत असून, आर्थिक अडचणीमुळे कोणाचाही उपचार थांबू नये या उद्देशाने सेवाभावातून रुग्णसेवा सुरू आहे. अनुभवी तज्ञ डॉक्टरांच्या योगदानामुळे हे हॉस्पिटल मानवसेवेचे प्रभावी केंद्र बनले आहे. भावी पिढीतील दृष्टीदोष दूर करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मंगलाताई रुणवाल यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालय येथे संथाराव्रतधारी श्रीमती पानाबाई लक्ष्मीचंदजी रुणवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अजय रुणवाल, सतीश रुणवाल व मंगल रुणवाल परिवार (विजापूर/पुणे) यांच्या वतीने आयोजित मोफत बाल नेत्रतपासणी व तिरळेपणा उपचार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी स्मितेश रुणवाल, सतीश रुणवाल, प्रेमभाऊ बोथरा, मनिषा बोथरा, संतोष बोथरा, संगीता बोथरा, सतीश बोथरा, प्रतिभा बोथरा, गौरव बोथरा, रोहन बोथरा, डॉ. अशोक महाडिक, बाल नेत्ररोग तज्ञ डॉ. निरंजन पेहेरे, नेत्रालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, श्याम चोरडिया, माणकचंद कटारिया, रवींद्र भंडारी, प्रकाश छल्लाणी आदींसह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, मागील अनेक वर्षांपासून आनंदऋषीजी नेत्रालयात हजारो शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत. लहान मुलांमधील दृष्टीदोष निर्मूलनासाठी नेत्रालयाने पुढाकार घेतला असून, वाढत्या डोळ्यांच्या समस्या वेळेवर लक्षात येत नाहीत. त्यामुळे पालकांनी जागरूक राहण्याची गरज आहे. मनपा व जिल्हा परिषद शाळांमधील साडेतीन हजार विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली आहे. गरजू विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देण्यात येत असून, निवडक म ुलांवर उन्हाळी सुट्टीत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तसेच महात्मा ज्योतिबा फ ुले जन आरोग्य योजनेचा लाभही दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रेमभाऊ बोथरा म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये 'दवा'सोबत 'दुवा' मिळत असल्याने संपूर्ण देशभर हॉस्पिटलची ख्याती पसरली आहे.

आनंद छाजेड यांनी सांगितले की, लहान मुलांमध्ये वाढत्या नेत्र समस्यांच्या पार्श्वभूमीवर या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, हे शिबिर महिनाभर सुरू राहणार आहे. बाल नेत्ररोग तज्ञ डॉ. निरंजन पेहेरे हे तिरळेपणा व इतर नेत्र विकारांवरील उपचारासाठी उपलब्ध आहेत. ते जिल्ह्याचे सुपूत्र असून, हैदराबाद येथील एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट, हैद्राबाद मध्ये गेल्या १६ वर्षांपासून कार्यरत होते व आता पूर्ण वेळ आनंदऋषिजी नेत्रालय येथे सेवा देत आहेत.

डॉ. निरंजन पेहेरे यांनी सांगितले की, नेत्र विकार लहान वयात ओळखून योग्य उपचार केल्यास भविष्यातील गंभीर धोके टाळता येतात. लहान मुलांना त्यांच्या दृष्टीदोषाची जाणीव होत नसल्याने पालकांनी नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. तिरळेपणा ही एकप्रकारची अपंगत्वाची स्थिती असून, यामुळे आत्मविश्वास कमी होतो तसेच करिअर व वैयक्तिक आयुष्यात अडचणी निम र्ण होतात. थ्री-डी व्हिजनवरही परिणाम होतो. मात्र योग्य वेळी उपचार केल्यास हे दोष पूर्णपणे दूर करता येतात.

या शिबिरात डॉ. कौस्तुभ घोडके, डॉ नचिकेत पारगावकर, डॉ कुशल शहा , डॉ किरण ढेरे, डॉ ऋषिकेश डेरे, डॉ सारडा यांनी देखील नेत्र तपासणी केली. शिबिरात तीनशे पेक्षा अधिक बालकांची नेत्र तपासणी करण्यात आली.

गुरु-शिष्याच्या भेटीने रंगला भावनिक क्षण

बाल नेत्ररोग तज्ञ डॉ. निरंजन पेहेरे यांच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देणारा भावनिक प्रसंग शिबिरात घडला. त्यांच्या रेसिडेन्शीअल विद्यालयातील शिक्षिका मंगला तवले यांनी पेपरमध्ये शिबिराची जाहिरात पाहून खास त्यांची भेट घेण्यासाठी उपस्थिती लावली. दहावी बोर्डाच्या परीक्षेत गुणवंत ठरलेला हा विद्यार्थी आज यशस्वी डॉक्टर झाल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. अचानक झालेल्या या भेटीने डॉ. पेहेरे यांनीही आनंद व्यक्त केला. या गुरु-शिष्याच्या भेटीने उपस्थितांना भावनिक क्षण अनुभवायला मिळाला.

दखल

श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम

ढोरजळगाव : महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्य शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने जाहीर झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इ १२ वी बोर्ड परीक्षेत श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल १००% तर कला शाखेचा ८९.६१ % निकाल लागला कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण निकाल ९५.४० % लागला.विज्ञान शाखेत कु.लबडे वैष्णवी दादासाहेब हिने ८६.१७ % गुण मिळवत प्रथम तर कु.खोसे मयुरी अविनाश हिने ८३.१७% व कु.फसले श्रेया शरदकुमार हिने ८०.१७ % गुण मिळवत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. तर कला शाखेत कु.वाकडे हर्षदा विशाल हिने ८७.१७ % गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला तर कु.नागरे ऋतुजा सुभाष ८६.००% व कु.बडे निकिता नवनाथ हिने ८२.१७% गुण मिळवत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करण्याऱ्या शिक्षकांचे कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष डॉ.विद्याधर उर्फ शिवाजीराव काकडे ,माजी जि.प सदस्या सौ.हर्षदाताई काकडे,विश्वस्त व उच्च मुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंग काकडे,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.लक्ष्मण बिटाळ ,शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी,सहप्रमुख अशोक आहेर यांच्यासह प्राचार्य संजय चेमटे,पर्यवेक्षिका सुरेखा शेलार यांचेसह सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि ढोरजळगाव ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

श्री गजानन विद्यालयाचा निकाल ८४.६१ टक्के

ढोरजळगांव : शेवगाव तालुक्यातील जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगावने संचलित श्री गजानन माध्य व उच्च माध्य विद्यालय आव्हाने बु.इयत्ता बारावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून महाविद्यालयाने यंदाही उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ८४.६१टक्के निकाल लागला आहे. विद्यालयामध्ये कु.डुरे श्रृती सुखदेव -६९.५० प्रथम, तर चि.चिंधे अनिल सुनील -६८.८३ व्दितीय,तर कु.पांढरे मुक्ता महादेव -६८.३३ हीने तृतीय क्रमांक मिळवला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्रजी घुले ,सचिव मा.आ.चंद्रशेखर घुले ,सौ राजश्रीताई घुले ,तसेच शेवगाव पंचायत समिती मा. सभापती डॉ.क्षितिज घुले संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के.वाय.नजन, समन्वयक विजय काशीद महाविद्यालयाचे प्राचार्य रमेश लांडे प्राध्यापक व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

सायली ढोले हिला भारत की बेटी पुरस्कार जाहिर



शेवगाव - पुणे येथील मिडीया वर्ल्ड तर्फे दिला जाणारा भारत की बेटी पुरस्कार सायली राजेंद्र ढोले यांना जाहिर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा म ातृदिनाचे औचित्य साधून दि. ९ मे रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृह, घोले रोड, शिवाजीनगर येथे संपन्न होणार आहे.

पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, पुण्याच्या सहाय्यक पोलिस आयुक्त अनुजा देशपांडे, पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समि तीच्या सभापती अंकिता पाटील ठाकरे, नवेली देशमुख आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होईल. सायली ढोले हिने बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल तिची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे शेवगाव तालुकाध्यक्ष राजेंद्र ढोले यांची सायली ही कन्या आहे. या पुरस्कारबद्दल सायली हिचे गटविकास अधिकारी सोनल शहा व गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांनी अभिनंदन केले आहे.

पेन्शनर संघटनेच्या गंभीर आरोप : वर्गणीचा निधी वळविला ?

श्रीगोंदा : राज्यातील बाजार समिती कर्मचारी व पेन्शनर वर्तुळात खळबळ उडवणारा आरोप सम ोर आला असून, पेन्शनर संघटनेचे अध्यक्ष दा. द. शिनगारे यांनी माजी पदाधिकाऱ्यांवर गंभीर आर्थिक व प्रशासकीय अनियमिततेचे आरोप केले आहेत.

कर्मचारी संघटनेच्या वर्गणीचा निधी नियमबाह्य पद्धतीने वळवण्यात आल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी डेबरे यांच्याकडून जाहीर स्पष्टीकरणाची मागणी केली आहे.शिनगारे यांच्या निवेदनानुसार, २००५ ते २०१५ या कालावधीत तसेच त्यानंतरही कर्मचाऱ्यांच्या वर्गणीतील निधीचा वापर पारदर्शकतेअभावी प्रश्नचिन्हाखाली आहे. हा निधी स्वतःच्या मर्जीतील पतसंस्थेत वळविल्याचे आरोप त्यांनी केले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

जयाद्री गडावर दरवळला मोगऱ्याचा सुगंध

शेकडो फुलांनी खंडोबा गाभाऱ्याची भव्य सजावट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

जेजुरी : महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या श्री खंडोबा मंदिरावर वैशाख महिन्यानिमित्त रविवारी जय मल्हार मोगरा महोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. गुरव पुजारी वीर कोळी घडशी मंडळाच्या वतीने शेकडो किलो मोगरा, जाई, जुई, जास्वंद व विविध सुगंधी फुलांनी श्री खंडोबाच्या गाभाऱ्याची आकर्षक सजावट करण्यात आली. या अलौकिक सजावटीमुळे संपूर्ण जयाद्री गड परिसर मोगऱ्याच्या दरवळत्या सुगंधाने भारावून गेला. पहाटे मंगलमय सनई-चौघड्यांच्या निनादात भूपाळी आरतीने महोत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर मंदिर संस्कृतीचे उपासक गुरव पुजाऱ्यांनी



धार्मिक विधीवत पूजा करून मोगऱ्यांची विशेष पुष्पार्चना श्री मल्हारी मार्तंडांना अर्पण केली. शेकडो किलो मोगऱ्यांच्या फुलांनी संपूर्ण गाभारा सजविण्यात आला होता. खंडोबा, म्हाळसादेवी आणि बाणाई देवी यांच्या मूर्तींची शीतल, मनोहारी आणि देखणी सजावट भाविकांचे विशेष आकर्षण ठरली.

पुरातन काळापासून मोगऱ्याच्या फुलाला धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. वैशाख महिन्यातील कृष्ण पक्षात उन्हाळ्याच्या तीव्रतेत श्री खंडेरायाला शीतलता लाभावी या भावनेतून मोगरा, जाई, जुई आणि पांढऱ्या फुलांनी सजावट करण्याची परंपरा जेजुरी गडावर आजही जपली जाते. रविवार आणि उन्हाळी सुट्टीचा योग आल्याने जेजुरी गडावर भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. त्रिकाळ पूजनानंतर या विलोभनीय मोगरा महोत्सवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या रांगा लावल्या. संपूर्ण गाभारा आणि पुढील महाल विविध फुलांच्या मोहक सजावटीने नटल्याने त्याचा सुगंध संपूर्ण जयाद्री परिसरात दरवळत होता. श्री खंडेरायाचे हे मोगऱ्याच्या शुभ्र फुलांनी सजलेले मनमोहक रूप पाहून भाविकांनी जय मल्हारच्या जयघोषात दर्शन घेत भक्तिभाव व्यक्त केला.

द•ख•ल

शारदाबाई पवार विद्यानिकेतनचा अभिमान, बारामतीत वर्चस्व !

बारामती : पुणे विभागाने घेतलेल्या एच.एस.सी. बोर्ड फेब्रुवारी २०२६ परीक्षेत शारदानगर येथील शारदाबाई पवार विद्यानिकेतन कनिष्ठ महाविद्यालयाने विज्ञान शाखेत १००% निकालाची परंपरा कायम ठेवली. कु. सिद्धी बाबासाहेब ढवळे हिने ९३.८३% गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. तसेच गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा मान मिळविला. कु. धनश्री कालिदास कुबेर हिने ९३.१७% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला तर कु. आकांक्षा ज्ञानेश्वर नमे हिने ९२% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. याशिवाय, आदित्य धनराज बावधनकर आणि कु. उत्कर्षा गोरक्षनाथ नवले यांनी अनुक्रमे माहिती तंत्रज्ञान आणि कृषी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम येत महाविद्यालयाचा गौरव वाढविला. याबरोबरच पुढील विद्यार्थ्यांनीही या निकालात उत्कृष्ट गुण मिळविलेः संयुक्ता उदय काकडे ८९.८३ टक्के , साईराज किरण महाडिक ८९.५० टक्के , यशराज विशाल शिदि-८८.८३ टक्के, राज राहूल शेरकर ८७.८३ टक्के, तन्वी कैलास होनमाने ८७.३३ टक्के , ऋतुजा सतिश पायघन व प्रांजली विनोद ढोरे- ८७ टक्के, आकांक्षा अमोल घनवट, सुरज संतोष सांगळे आणि सार्थक संजय विधाते ८६.८३टक्के . या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन राजेंद्र पवार, विश्वस्त सुनंदाताई पवार, संस्थेचे सीईओ निलेश नलावडे, एच. आर. गार्गी दत्ता, समन्वयक प्रशांत तनपुरे, मुख्याध्यापक सुर्यकांत मुंढे व विभागप्रमुख योगेश झणझणे यांनी केले.

जुन्या आराखड्या प्रमाणे कांदाचाळ उभारणीस परवानगी द्यावी - अंकिता

लोणी धामणी : आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांकडून एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाअंतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापन घटकातील कांदाचाळ आराखड्याबाबत सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली आहे. या अभियानाअंतर्गत आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांची कांदाचाळ बांधणीसाठी निवड करण्यात आली आहे. मात्र, नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार कांदा साठवणुकीच्या वर ०.६० मीटर अंतर ठेवून छत बांधणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, अशा प्रकारच्या रचनेमुळे वादळी वारे व मुसळधार पावसात कांदाचाळीचे पत्रे उडून जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सदर आराखड्यात आवश्यक सुधारणा करून जुन्या पद्धतीनुसार कांदाचाळ उभारण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी आंबेगाव तालुका पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज मागणी संबंधित विभागाकडे केली आहे. या संदर्भात प्रशासनाने याकडे लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

कान्हूर मेसाईत पाणी योजना फक्त नावापुरतीच कोट्यवधींचा निधी खर्चूनही गाव तहानलेलेच!

कान्हूर मेसाई : सरकारने 'हर घर जल' या घोषणेखाली जलजीवन मिशन अंतर्गत कान्हूर मेसाई (ता. शिरूर) गावासाठी कोट्यवधींचा निधी मंजूर केला खरा, मात्र प्रत्यक्ष जमिनीवर परिस्थिती 'धो धो' ऐवजी 'कोरडी'च दिसत आहे. प्रशासकीय उदासीनता आणि निधीच्या तुटवड्यामुळे ही महत्त्वाकांक्षी योजना सध्या केवळ कागदावर आणि बातम्यांपुरतीच मर्यादित राहिल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. बंधारे कोरडे, नागरिकांचे हाल सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने परिसरातील

विहिरींनी तळ गाठला आहे. थिटेवाडी बंधारा पूर्णपणे कोरडा पडला असून मेसाई देवी मंदिरामागील साठवण तलावातही नावापुरताच पाणीसाठा शिल्लक आहे. अशा परिस्थितीत नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण होणे अपेक्षित होते, मात्र पाइपलाइन आणि इतर तांत्रिक कामे अर्धवट अवस्थेत असल्याने पाण्याचा थेंबही नळाला आलेला नाही. काही दिवसांपूर्वी या भागासाठी ६०० कोटींच्या नवीन पाणी योजनेच्या गप्पा मारल्या गेल्या. मात्र, जुनीच योजना पूर्ण होत नसल्याने ''आधी हातातील काम पूर्ण करा, मग नवीन स्वप्ने दाखवा,'' अशी भावना कान्हूर मेसाईकर व्यक्त करत आहेत. सध्या गावठाणसह वाड्यावस्त्यांवरील महिलांना पाण्यासाठी मैलोमैल पायपीट करावी लागत आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ग्रामपंचायतीने टँकरचा प्रस्ताव दिला असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, दरवर्षी हीच परिस्थिती उद्भवत असल्याने कायमस्वरूपी उपाययोजना कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जर लवकरात लवकर नळ योजना कार्यान्वित झाली नाही, तर ग्रामस्थांकडून तीव्र आंदोलनाचा पवित्रा घेण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

पेठ अवसरी घाटात जुन्नर ते मुंबई एसटी गाडीला आग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

निरगुडसर : पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील मंचरजवळील पेठ घाटात शुक्रवारी (दि.. १) उशिरा रात्री जुन्नरहून मुंबईकडे निघालेल्या एसटी बसला (क्र. चक१४ इढ ४१५५) अचानक आग लागल्याची घटना घडली. मात्र चालकाच्या प्रसंगावधानामुळे सर्व प्रवासी सुरक्षित बचावले असून मोठी दुर्घटना टळली. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे साडेअकराच्या सुमारास बस घाटातून प्रवास करत असताना अचानक इंजिनमधून धूर निघू लागला. काही क्षणांतच बसच्या पुढील भागाने पेट घेतला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चालक भगवंता सुभाष म्हस्के यांनी तत्काळ बस रस्त्याच्या कडेला घेतली व सर्व प्रवाशांना खाली उतरवले. यानंतर बसमधील अग्निशामक यंत्राच्या सहाय्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. चालक म्हस्के, वाहक भाऊसाहेब चंद्रभान बडे तसेच काही प्रवाशांनी मिळून आग नियंत्रणात आणली. या घटनेमुळे बसमधील महिला, लहान मुले व इतर प्रवाशांमध्ये काही काळ घबराट पसरली होती. धावपळीत दोन ते तीन प्रवाशांना किरकोळ दुखापत झाल्याची माहिती आहे. दरम्यान, नारायणगाव आगारातून पर्यायी एसटी बस घटनास्थळी पोहोचण्यासाठी सुमारे दोन तासांचा कालावधी लागला. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. त्यानंतर सर्व प्रवाशांना मुंबईकडे रवाना करण्यात आले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर एसटी बसच्या देखभालीकडे राज्य परिवहन महामंडळाने विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी कामगार नेते ॲड. बाळासाहेब बाणखेले यांनी केली आहे.

आळंदीत 'विश्वमंगल मराठी फाउंडेशन'चा दिमाखदार शुभारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळंदी : मराठी भाषा, संस्कृती, शाळा व उद्योगांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विश्वमंगल मराठी फाउंडेशनचा भव्य शुभारंभ येथील फ्रुटवाले धर्मशाळा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. आमदार सुभाष बापू देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या सोहळ्यास राज्यभरातून तसेच देश-विदेशातून उद्योजक, मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधीचे महापूजन करून दिंडी काढण्यात आली.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून विवेकजी घळसासी, संजय वायाळ, डॉ.उदय भोसले व आप्पासाहेब कोंढारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, फाउंडेशनच्या लोगो व संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. प्रास्ताविकात आमदार देशमुख यांनी लोकल टू ग्लोबल व ग्लोबल टू लोकल ही संकल्पना मांडत मराठी शाळा व उद्योगांना जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी फाउंडेशन कार्यरत राहील, असे सांगितले. यावेळी विवेकजी घळसासी यांनी देशमुख यांच्या २८ वर्षांच्या लोकमंगल ते विश्वमंगल प्रवासाचा गौरव करत मराठी संस्कार व परंपरा जपण्याचे आवाहन केले.

यानंतर आयोजित उद्योजक परिसंवादात नवउद्योजकांना जागतिक संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पंढरपूर ते आळंदी सायकलवारी करणाऱ्या सायकलवीरांचा सन्मान करण्यात आला. तसेच कृष्णाई उळेकर यांच्या समाजप्रबोधनात्मक भारुडाने कार्यक्रमात रंगत आणली. विविध गावांतील जिल्हा परिषद शाळा दत्तक घेणाऱ्या उद्योजकांचा गौरव करण्यात आला असून आळंदी येथे फाउंडेशनची पहिली स्थानिक समिती स्थापन करण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप पसायदानाने करण्यात आला.

धामणीत अष्टगंधउटी फळ महोत्सव उत्साहात

खंडोबा देवस्थानाचा उपक्रम: सुगंधी फुलाची नयनरम्य आरस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

धामणी, आंबेगांव : येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात स्वयंभू सप्तशिवलिंगाचा व खंडोबा.म्हाळसाई.व बाणाईच्या सर्वांगसुंदर मुखवट्यांचा वासंतिक अष्टगंधउटी व फळ महोत्सव शुक्रवार(१मे) रोजी उत्साहात साजरा झाला.वैशाख पौर्णिमा व बुध्द पौर्णिमेनिमित्त पारंपारिक अष्टगंधउटी सोहळ्यासाठी झेंडू. अष्टर.गुलाब.मोगरा आणि शुध्द अष्टगंधाचा वापर करण्यात आला. वाढत्या उन्हापासून देवाला थंडावा मिळावा,या भावनेतून स्वयंभू सप्तशिवलिंगाला व मुखवट्यांना अष्टगंधाचा लेप लावून गाभार्यात सुगंधी फुलांची व फळांची आरास करण्यात आली होती. यामुळे अवघे मंदिर परिसर भक्तिने आणि सुगंधाने न्हाऊन निघाले होते. होते.बुध्द पौर्णिमेच्या मुहर्तावर शुक्रवारी (१मे२६) शेकडो भाविकांनी ''सदानंदाचा येळकोट,जय मल्हारच्या नामघोषात धामणी (तालुका आंबेगांव) येथील पुरातन श्री म्हाळसाकांत खंडोबाचे दर्शन घेतले वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने खंडेरायाच्या स्वयंभू सप्तशिवलिंगावर सरत्या चैत्र व वैशाख महिण्यातील वसंत व ग्रीष्म ऋतुतील चौथी वासंतिक

अष्टगंधउटी साकारण्यात आली. खंडोबा.म्हाळसाई व बाणाईच्या व स्वयंभू सप्तशिवलिंगावर साकारलेल्या अष्टगंधटीचे मनमोहक रुप पाहाण्यासाठी तसेच दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. तत्पूर्वी धामणीच्या पुरातन खंडोबा मंदिरात पहाटे चार वाजता घंटानाद झाला. अकरा जोडप्यांच्या हस्ते वसंत पूजा व दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक संपन्न झाला.खंडेराय म्हाळसाई बाणाई व जोगेश्वरीच्या देखण्या मूर्तीना वस्त्रालंकार व सुंगधी फुलांचे हार घालण्यात आल्यानंतर देवस्थानाचे सेवेकरी प्रभाकर भगत.दादाभाऊ भगत. सुभाष तांबे.शांताराम भगत.नामदेव भगत. पांडुरंग भगत.धोंडीबा भगत.अनिरुध्द वाळूंज. बाळशिराम साळगट यांच्याकडून स्वयंभू सप्तशिवलिंग आणि पंचधातूच्या सर्वांगसुंदर देखण्या खंडोबा. म्हाळसाई व बाणाईच्या मुखवट्यावर सुवासिक केशर व सुंगधी दवण्याचे अत्तरमिश्रित अष्टगंध उटीचा लेप देण्यात आला.त्यानंतर खंडेरायाला नैवेद्य दाखवण्यात येऊन शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. नवविवाहीत जोडपी कुटुंबियासह आलेले दिसत होते.मंदिराच्या जागरण मंडपात पांच नामाची जागरणाचे घट मांडून वाघे व वीर मंडळी जागरणे करताना दिसत होती .

दफनभूमीअभावी फासेपारधी समाजाची अडचण

पुरंदर तालुक्यात मूलभूत सुविधांची तीव्र कमतरता; शासनाकडे वारंवार मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

'सासवड : पुरंदर तालुक्यातील प्रत्येक गावात फासेपारधी समाजाचे वास्तव्य असूनही त्यांच्या पारंपरिक दफनविधीसाठी आवश्यक जागा व सुविधा उपलब्ध नसल्याने समाजाला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मृत्यूनंतर दहनऐवजी दफन करण्याची परंपरा असलेल्या या समाजासाठी स्वतंत्र दफनभूमीची अत्यंत गरज निर्माण झाली आहे. मात्र, शासनस्तरावर अद्याप ठोस निर्णय न झाल्याने नाराजी व्यक्त होत आहे.फासेपारधी समाज हा हिंदू परंपरेशी निगडित असला तरी त्यांच्या मृत्यूसंस्कारांची पद्धत वेगळी आहे. मृत व्यक्तीचे दफन केल्यानंतर दुसऱ्या दिवशी 'भाजी-भाकर' टाकण्याची आणि दशक्रिया दिवशी 'विचार' टाकण्याची प्रथा आहे. या विधींकरिता योग्य जागा, पाणी व निवाऱ्याची आवश्यकता असते. मात्र, अनेक गावांमध्ये अशी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही.

नाझरे सुपे गावातील परिस्थिती विशेषतः चिंताजनक आहे. येथे सुमारे ४० लोकांची दफनभूमी असूनही त्या ठिकाणी ना शेड आहे, ना पिण्याच्या पाण्याची सोय, ना रस्ता. पावसाळ्यात या ठिकाणी जाणे अत्यंत कठीण होते. वृद्ध, महिला आणि लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत धार्मिक विधी पार पाडणेही अवघड बनते.

> **आमच्या समाजाच्या धार्मिक परंपरांचा आदर ठेवून शासनाने प्रत्येक गावात दफनभूमी, शेड, रस्ता आणि पाणी यांची व्यवस्था करावी. आम्ही वारंवार मागणी करत आहोत, मात्र अजूनही ठोस निर्णय झालेला नाही.**
>
> **फासेपारधी समाजाचे प्रतिनिधी**

महत्त्वाचे मुद्दे

- प्रत्येक गावात फासेपारधी समाजाचे वास्तव्य
- दफनभूमीसाठी स्वतंत्र जागेचा अभाव
- नाझरे सुपे येथे शेड, पाणी, रस्ता नाही
- पावसाळ्यात मोठ्या अडचणी
- समाजाची संख्या वाढत असल्याने समस्या तीव्र

गेल्या काही वर्षांत फासेपारधी समाजाची लोकसंख्या वाढत असून दफनभूमीवरील ताणही वाढत आहे. त्यामुळे प्रत्येक गावात स्वतंत्र जागा, शेड, रस्ता आणि पाणी यांसारख्या मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरत आहे. समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे यासंदर्भात निवेदन देण्यात आले असून सुनिल देशा काळे व अमोल उत्तम शिंदे यांनीही या मागणीसाठी पुढाकार घेतला आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

पुरंदर तालुक्याबरोबरच पुणे जिल्ह्यातील इतर भागांतही फासेपारधी समाजाला अशाच समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची माहिती पुढे येत आहे. अनेक ठिकाणी तात्पुरत्या जागांवर दफनविधी केले जातात.

ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूलचा पहिल्याच बॅचचा १०० टक्के निकाल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळंदी : येथील ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या विज्ञान शाखेच्या बारावी परीक्षेचा निकाल अत्यंत उज्ज्वल लागला असून, संस्थेच्या पहिल्याच बॅचने शंभर टक्के निकालाची नोंद करत यशाची नवी परंपरा निर्माण केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील या बॅचमधील सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन करत संस्थेचा लौकिक उंचावला आहे. विशेष बाब म्हणजे, बहुतांश विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत यश मिळवत उल्लेखनीय

कामगिरी केली आहे. या यशामागे विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य हे महत्त्वाचे घटक ठरले असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.विजय गुळवे व सचिव वैष्णवी गुळवे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी भविष्यातही मेहनत आणि प्रगतीचा ध्यास कायम ठेवावा, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, प्राचार्य व शिक्षकवृंदांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत भविष्यातही अशाच यशाची परंपरा कायम राखण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

अहिल्यादेवींचा कारभार आजही लोकशाहीचा मार्गदर्शक : राम शिंदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित भव्य सोहळ्यात राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमास महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती आ. राम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन करताना विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी आपल्या मनोगतातून अहिल्यादेवींच्या सुशासनाचा धागा पकडत उपस्थितांना संबोधित केले. ते म्हणाले, ''अहिल्यादेवींनी 'सत्ता ही ईश्वराची अमानत' मानून जो न्यायनिष्ठ आणि पारदर्शक लोककल्याणकारी कारभार केला, तो आजही आधुनिक लोकशाही व्यवस्थेसाठी सर्वात मोठा आदर्श आहे. त्यांनी केवळ राज्य केले नाही, तर प्रजेच्या सुख-दुःखात सहभागी होऊन समाजधारणेची नवी मूल्ये रुजवली.''

यावेळी बोलताना आमदार राम शिंदे यांनी त्यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, ''अहिल्यादेवींनी संपूर्ण भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाचे कार्य केले. काशी, सोमनाथ, गया यांसारख्या तीर्थक्षेत्रांच्या जीर्णोद्धारातून त्यांनी देशाची सांस्कृतिक एकात्मता बळकट केली. महेश्वरी वस्त्रोद्योगातून आर्थिक स्वावलंबन आणि महिलांना संपत्तीचा अधिकार देऊन त्यांनी सामाजिक समतेचा नवा मानदंड प्रस्थापित केला. चोंडी येथील विकास आराखड्याच्या माध्यमातून त्यांचे हे महान कार्य जागतिक स्तरावर नेणे, हे आमचे कर्तव्य आहे.''

सोहळ्यात अहिल्यादेवींच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम आणि समूहगीतांचे सादरीकरण झाले. याप्रसंगी यशवंतराव होळकर (तृतीय), अमरजीत राजे बारगळ, हेमंत हरहरे, नितीन वाघमोडे, राजेंद्र कुराडे, लहूराज गंडे, ऋषिकेश परांजपे, धनंजय तानले, भुजंगराव दुधाळे, राजेंद्र गाडेकर, डॉ. झुंजारराव बदडे आणि रेश्मा खरात यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्याने उपस्थितांना अहिल्यादेवींच्या गौरवशाली इतिहासाची प्रचिती दिली.

बारामतीत मोटारसायकल चोरी प्रकरणांचा छडा

४ गुन्ह्यांचा उलगडा, वाहनांची यशस्वी जप्ती..!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बारामती : बारामती शहर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने मोटारसायकल चोरीच्या मालिकेचा यशस्वी छडा लावत चार वेगवेगळ्या गुन्ह्यांचा उलगडा केला आहे. या कारवाईत आरोपीकडून विविध कंपन्यांची मोटारसायकल व स्कुटी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोलिसांच्या तत्परतेमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली आहे. बारामती शहर पोलीस स्टेशन गु.र.नं. ०१६६/२०२६, भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) अन्वये दाखल गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलीस हवालदार यशवंत पवार (तपासी अंमलदार) यांना गोपनीय माहिती मिळाली. संबंधित इसम चोरीच्या मोटारसायकली वापरत असून त्या विविध ठिकाणी लपवून ठेवत असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ हालचाल करत सापळा रचला व संशयित आरोपीस ताब्यात घेतले. आरोपीची सखोल चौकशी केली असता त्याच्यासोबत एका अल्पवयीन विधी संघर्ष बालकाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. पुढील तपासात आरोपीने चोरीच्या वाहनांबाबत महत्त्वाची माहिती दिली. या माहितीच्या आधारे तपास पथकाने विविध ठिकाणी शोधमोहीम राबवत कौशल्यपूर्ण तपास करून चोरीस गेलेली वाहने हस्तगत केली.

या कारवाईदरम्यान बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतील गुन्ह्यासह बारामती तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील दोन तसेच वेळापूर पोलीस स्टेशन (जि. सोलापूर ग्रामीण) हद्दीतील एक अशा एकूण चार गुन्ह्यांतील मुद्देमाल आरोपीकडून जप्त करण्यात

आला. जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये यामाहा कंपनीची ठदऋ मोटारसायकल, हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल, यामाहा कंपनीची आणखी एक मोटारसायकल तसेच होंडा ॲक्टिवा स्कुटी यांचा समावेश आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस हवालदार यशवंत पवार यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या तपास पथकात पोलीस शिपाई अक्षय सिताफ, पोलीस हवालदार रामचंद्र शिंदे, पोलीस शिपाई अमोल देवकाते, पोलीस शिपाई गिरीश नेवसे, पोलीस शिपाई पोपट कवितके, पोलीस शिपाई विशाल शिंदे, पोलीस शिपाई सागर जामदार तसेच सहायक पोलीस उपनिरीक्षक संदीप जाधव यांनी परिश्रम घेतले. तपासाचे मार्गदर्शन पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप भंडारे यांनी केले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड तसेच प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली. या यशस्वी कारवाईमुळे मोटारसायकल चोरी करणाऱ्या चोरट्यांवर प्रभावी वचक बसला असून नागरिकांनी वाहन पार्क करताना योग्य लॉकचा वापर करावा, सुरक्षित व सीसीटीव्ही असलेल्या ठिकाणी वाहन उभे करावे तसेच संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पोलीसांना कळवावे, असे आवाहन बारामती पोलिसांनी केले आहे.

चोरीचे २० तोळे सोने सराफाकडून जप्त

आरोपी महिलेकडून गुन्ह्याची कबुली
सराफाला आरोपी करण्याची फिर्यादीची मागणी
कोतवाली पोलिसांची धडक कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : बस प्रवासादरम्यान चोरी गेलेल्या तब्बल २० तोळे सोन्याच्या दागिन्यांचा गुन्हा उघडकीस आणत कोतवाली पोलिसांनी धडक कारवाई करत चोरीचा तपास पूर्ण केला. २० तोळे सुमारे २५ लाखाचे सोने जप्त करण्यात यश मिळवले. या कामगिरीबद्दल पोलिसांचे कौतुक होत आहे. चोरीचे सोने विकत घेणाऱ्या सराफावर देखील कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी नेवासा तालुक्यातील फिर्यादी महिलेने अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनानुसार, फिर्यादी महिला मिनाबाई बडाख ७ एप्रिल २०२६ रोजी पुणेपाथर्डी एसटी बसने अहिल्यानगरकडे प्रवास करत होत्या. रांजणगाव (जि. पुणे) येथे दोन अनोळखी महिला बसमध्ये चढल्या. त्यापैकी एक महिला त्यांच्या शेजारी येऊन बसली. काही वेळाने झोप लागल्यानंतर त्या महिलांनी संधी साधून बडाख यांच्या बॅगेतील सोन्याचे दागिने चोरून नेले.

अहिल्यानगर बसस्थानकावर उतरल्यावर हा प्रकार लक्षात येताच बडाख यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी तत्परतेने तपास करत माया कल्याण भोसले (रा. हादगाव, ता. शेवगाव) हिला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान तिने गुन्ह्याची कबुली देत चोरीचे सोने बोधेगाव येथील सराफ व्यावसायिक भागवत मधुकर आदापुरे याला विकल्याचे सांगितले. यानंतर पोलिसांनी संबंधित सराफाकडून चोरीचे सर्व सोने एका तासात जप्त केले. त्यामुळे पीडित महिलेला दिलासा मिळाला आहे. मात्र, या प्रकरणात चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या सराफावर अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी सदरचे चोरी गेलेले सोने हे सराफ दुकानदार भागवत मधुकर आदापुरे यांच्याकडून जप्त केलेले आहे. असे असतांनाही संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांनी केवळ माया कल्याण भोसले हिलाच सदर गुन्हयामध्ये आरोपी केलेले आहे. सराफ भागवत मधुकर आदापुरे हा अदयापही मोकाट फिरत आहे. वास्तविक पहाता भागवत मधुकर आदापुरे यास देखील सदर गुन्हयामध्ये आरोपी करणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत गरजेचे व आवश्यक असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

भागवत मधुकर आदापुरे रा. बोधेगांव, ता. शेवगांव, जि. अहिल्यानगर यास सदर गुन्हयात आरोपी करण्यांत यावे, अन्यथा कुटुंबीयास पोलीस अधीक्षक कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा बडाख यांनी दिला आहे.

सराफ सुवर्णकार समितीचा हस्तक्षेप

जिल्ह्यातील नागरिकांना एवढ्या मोठ्या प्रमाणात लुटणाऱ्या टोळीकडून जिल्ह्यातील एका सोनाराने सोने विकत घेतले. त्यांच्याकडे याबाबत तपास करत असताना सराफ सुवर्णकार समितीचे उमेश बुऱ्हाडे(बारामती जि.पुणे), प्रथमेश नगरकर (पुणे) व शशिकांत दीक्षित (सातारा) यांनी विविध मागणी तपास कामात अडथळा निर्माण केला, तसेच गुन्ह्यातील सोनारांची दिशाभूल करून त्यांच्यावर दबाव टाकून गुन्ह्यातील सोन्याचे दागिने हस्तगत होऊ नयेत म्हणून प्रयत्न करत चोरीचे सोने घेणाऱ्यांना अभय देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. त्यामुळे चोरी झालेले दागिने हस्तगत करण्यात अडथळा निर्माण झाला होता; परंतु तपास पथकाने कौशल्याने तपास करून दागिने हस्तगत केले. मात्र सराफ सुवर्णकार समितीचे तपास करणाऱ्या पोलिसांविरुद्ध उपोषण सुरू केलेले आहे.

द•ख•ल

प्रगत माध्य.व उच्च माध्य. विदयालयाचा १२ वी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के

अहिल्यानगर : दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या प्रगत उच्च माध्यमिक विभाग इ. १२ वी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी / मार्च २०२६ विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे. विज्ञान शाखेत विधाते हर्षवर्धन शिवाजी हा ८५.६७ टक्के घेऊन प्रथम क्रमांक, चन्ना वैभव प्रमोद हा ८३.१७ टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर पोटदुखे ऋतुजा अशोक ही ७६.६७ टक्के घेऊन तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसेच वाणिज्य शाखेचा निकाल ६० टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेत नामदे अवनी चित्तरंजन ८६.५० टक्के घेऊन प्रथम क्रमांक, गुगळे कार्तिक राहुल ८२.३३ टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर नागपाल मेहक विशाल ८१.८७ टक्के घेऊन तृतीय क्रमांक मिळवला आहे. सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा विजया चंद्रकांत रेखे, सचिव किरण वैकर, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, खजिनदार उमेश चंद्रकांत रेखे, का. सदस्य महेश चंद्रकांत रेखे, उदयकुमार भणगे, उमेश नगरकर, प्राचार्य सुनिल पंडित, सर्व विभाग प्रमुख व हर्षाली देशमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

बुद्धिबळ खेळाडूंमध्ये दूरदृष्टी, संयम आणि सहनशीलता : उपमहापौर धनंजय जाधव

अहिल्यानगर : अहिल्यानगर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित उपमहापौर धनंजय जाधव यांच्या नावाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहात पार पडला. अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित ही स्पर्धा ७, ९, १३ व १९ वर्षांखालील खेळाडूंसाठी घेण्यात आली आहे. गायत्री मंगल कार्यालय, महाजन गल्ली येथे पार पडलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन उपमहापौर धनंजय जाधव व संघटनेचे सचिव यशवंत बापट यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन करण्यात आले. या वेळी खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त श्याम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, पंच देवेंद्र ढोकळे, प्रशांत घंगेकर, चेतन कड, मनिष जसवानी तसेच खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, बुद्धिबळासारख्या बौद्धिक खेळाचे उद्घाटन करण्याची संधी मिळणे हे भाग्याची बाब आहे. बुद्धिबळ खेळाडूंमध्ये दूरदृष्टी, संयम आणि सहनशीलता असते. अशा खेळामुळे व्यक्तिमत्त्व घडते, असे त्यांनी सांगितले. तसेच संघटनेची हॉलसंदर्भातील मागणी सकारात्मकरीत्या विचारात घेऊन महानगरपालिकेमार्फत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.या स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंमधून अहिल्यानगर जिल्ह्याचा मुलांचा व मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निश्चित करण्यात येणार आहे. प्रत्येक वयोगटातील पहिल्या पाच मुला-मुलींना उपमहापौर धनंजय जाधव करंडक देऊन गौरविण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष श्री नरेंद्र फिरोदिया यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रकाश गुजराथी यांनी केले.

गोरगरीब व कामगारांच्या मुलासाठी मिठाई, शालेय साहित्य वाटप

जामखेड : जामखेड तालुक्यातील खर्डा शहरात मदारी वसाहतीत तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती साजरी करण्यात आली.तसेच १ मे या कामगार दिना निमित्त कामगार तसेच कामगारांच्या मुला मुलींना मिठाई व शालेय साहित्य वाटप करण्यात आले. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे खर्डा शहर अध्यक्ष गणेश जाधव यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्रिशरण पंचशील घेऊन विधिवत पूजा करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन बाळासाहेब शिंदे यांनी केले.यावेळी मातंग समाजातील आरोशी गायकवाड या इयत्ता पाचवी मधील मुलीने ८४ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचा सन्मान शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमासाठी अण्णाभाऊ साठे स्मारक समितीचे अध्यक्ष विलास जाधव,सामाजिक कार्यकर्ते.शंकर गायकवाड,ग्राम. सदस्य दिपक जावळे, युसुफ बागवान,हुसेन मदारी,सलीम मदारी, इस्माईल मदारी,दादा मोरे, अखिलेश शिंदे, अंकुश डाडर .समाधान जाधव,आतिश जाधव, किरण गायकवाड,सचिन जाधव,निखिल अडागळे, अमोल अडागळे, सोनू पैठनपगार, बैटी जाधव, इरफान मदारी, भैय्या जाधव,आदी बहुसंख्येने कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सलीम मदारी यांनी गणेश जाधव यांच्या सामाजिक कार्याचे तोंड भरून कौतुक करून त्यांना मिठाई भरवून अभिनंदन केले.

डॉ.एन.जे.फार्मा रिदम-२०२६, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव
क्रीडा-शिस्त-आरोग्याचा समतोल साधा : प्रा.धोपावकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन.जे. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी येथे वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन 'फार्मा रिदम - २०२६' हा बहुप्रतिक्षित कार्यक्रम माऊली सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग, आकर्षक सांस्कृतिक सादरीकरणे आणि गुणवंतांचा सन्मान यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पेमराज सारडा कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संजय धोपावकर तसेच श्री. स्वामी समर्थ आयुर्वेद चिकित्सालयाचे वैद्य लक्ष्मीकांत कोर्टीकर उपस्थित होते.

कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, तंत्रसंचालक डॉ.रेखाराणी खुराणा उपस्थित होते. प्राचार्य डॉ. श्याम पांगा यांनी बी.फार्म व एम.फार्म विभागाचा वार्षिक अहवाल सादर करताना महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच प्राचार्या डॉ.अनुराधा चव्हाण यांनी डी.फार्म विभागाचा सविस्तर अहवाल मांडला.

यावेळी प्रा.संजय धोपावकर म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक यश पुरेसे नसून शारीरिक तंदुरुस्ती तितकीच आवश्यक आहे. नियमित क्रीडा उपक्रमांमुळे शरीरातील हार्मोनल संतुलन राखले जाते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि व्यक्ती निरोगी जीवन जगू शकते. खेळामुळे मानसिक ताण कमी होतो, एकाग्रता वाढते आणि औषधांवरील अवलंबित्वही कमी होते.कार्यक्रमास संस्थेअंतर्गत विविध शाळांच्या मुख्याध्यापिकाअंजली शिरसाठ, सौ.मीरा नराल, विजया नवले, अनिता सिद्धम उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख डॉ. वेणू कोला, डॉ. प्रसाद घुगरकर, डॉ. रोशनी सूर्यवंशी,डॉ. विजय तारडे, प्रा.स्वाती कडनोर यांनी मोलाचे योगदान दिले. तसेच सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख सहा. प्रा. पल्लवी कदम, सहा.प्रा. रुपाली माताडे यांनी उत्कृष्ट नियोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रोशनी सूर्यवंशी व सहा. प्रा. श्रद्धा मुंदडा यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सहा. प्रा. प्राजक्ता निमसे यांनी सर्व मान्यवर व उपस्थित यांचे आभार मानले. प्राचार्य डॉ.श्याम पांगा यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत सर्वांचे अभिनंदन केले.

श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात

अहिल्यानगर : श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत ज्येष्ठ शिक्षक गायकवाड बापूसाहेब सुखदेव यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित समारंभ अत्यंत भावनिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी संस्थेचे सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर सर अध्यक्षस्थानी होते. उपाध्यक्ष दीपक ओहोळ, व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, खजिनदार संजय कुलकर्णी, सदस्य स्वप्निल कुलकर्णी, सुनील जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य सौ. अनघा अत्रे मॅडम, माजी मुख्याध्यापक दुर्योधन कासार, प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी, पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका वसुधा जोशी मॅडम यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात सुरेश क्षीरसागर म्हणाले की, गायकवाड सरांनी आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञानच नाही तर संस्कारांचीही रुजवण केली. त्यांची कार्यनिष्ठा, शिस्त आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी ही सर्व शिक्षकांसाठी प्रेरणादायी आहे.

कार्यक्रमात सहकारी शिक्षक व माजी विद्यार्थ्यांनीही गायकवाड सरांविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

मराठी माणसांना रोजगार मिळवून दिला : टायरवाले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांच्या वतीने कामगार आणि खेळाडूंचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात कामगारांच्या योगदानाचा गौरव करतानाच खेळाडूंनाही प्रोत्साहन देण्यात आले. .

यावेळी बाबुशेठ टायरवाले यांनी आपल्या संघर्षमय वाटचालीचा उल्लेख करत सांगितले की, अहिल्यानगरमध्ये येऊन मला पन्नास वर्षे झाली. या काळात समाजातील गोरगरिबांच्या न्यायासाठी सतत लढा दिला. कामगार संघटनेच्या माध्यमातून हजारो मराठी कामगारांना रोजगार मिळवून दिला. त्यांच्या हक्कासाठी वेळोवेळी आंदोलन केले, जेलमध्ये जाण्याची वेळ आली तरी मागे हटलो नाही.

यावेळी बाबुशेठ म्हणाले की, शिवसेना पक्षप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारातून प्रेरणा घेत २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण केले. मी कधीही कोणाच्या दबावाला बळी पडलो नाही, पैशासाठी इमान गहाण ठेवले नाही. प्रामाणिकपणे काम केल्यामुळेच नागरिकांनी भरभरून प्रेम दिले, १९९५ साली मी खासदार झालो असतो मात्र पक्षाने त्यावेळी परवेज दमानिया यांना उमेदवारी दिली. खेळाडूंविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, मातोश्री स्पोर्ट क्लबच्या माध्यमातून अनेक उत्कृष्ट फुटबॉलपटू घडवले असून काही खेळाडूंनी आपले करिअर घडवले आहे. खेळामुळे शरीर निरोगी राहते. विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहून आपल्या आवडीच्या कला आणि खेळांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, ज्येष्ठ नेते श्रीराम शेंडे, नगरसेवक महेश लोंढे, बाबू कावरे, आनंद शेळके, सुनील काळे, वसंत सिंग, नितीन खाडे, रणजीत परदेशी, प्रकाश हापसे, अनिल लोखंडे यांच्यासह कामगार व फुटबॉल खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संभाजी कदम, ज्येष्ठ नेते श्रीराम शेंडे यांनी बाबुशेठ टायरवाले यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसंत सिंग यांनी केले. संपूर्ण सोहळा उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमातून कामगारांचा सन्मान आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचला.

शिक्षणात गुणवत्ता हाच प्रगतीचा खरा पाया : आशुतोष काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शिक्षणात गुणवत्ता हाच प्रगतीचा खरा पाया आहे. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाने शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्तेच्या बाबतीत आपला वेगळा ठसा उमटवला असून हे यश प्राचार्य शाखाप्रमुख गुणवंत शिक्षक आणि रयत सेवकांच्या सांघिक प्रयत्नांचे फळ आहे म्हणून गुणवंतांचा सन्मान म्हणजे गुणवत्तेचा व उद्याच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान असल्याचे प्रतिपादन उत्तर विभागाचे विभागीय चेअरमन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाच्यावतीने आयोजित 'समन्वय समिती सहविचार व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ' प्रसंगी ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.खासदार शरद पवार यांचे विचार काळाच्या पुढे असतात व त्यामुळेच संस्था डिजिटल झाली आहे. या बैठकीपूर्वी रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या मीनाताई जगधने यांना श्रीरामपूर शहर भीमोत्सव समितीतर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा ड.भगीरथ शिंदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. ड.भगीरथ (काका)शिंदे म्हणाले की,जेव्हा गुणवत्ता बोलू लागते, तेव्हा प्रगतीचे नवे मार्ग प्रशस्त होतात. उत्तर विभागाचा हा सन्मान सोहळा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल गुणवत्ता कक्षाचे काटेकोर नियोजन व पाठपुरावा यामुळेच हे यश मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले.

उत्तर विभागातील ज्या शाखांनी शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी केली आहे अशा गुणवंत शाखांचा विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य, बाबासाहेब भोस, कुंडलिकराव दरेकर, ज्ञानदेव पांडुळे, इंजिनिअर अनिल साळुंखे, प्रा.ए.टी. पोकळे, संदीप वर्षे, मा. सचिव शिवाजी भोर, पद्मांकांत

कुदळे, मोहन काकड, अण्णासाहेब शेलार, कारभारी आगवान, मनोज कवडे, सुरेश बोळीज उपस्थित होते. यावेळी विभागातील शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, समन्वय समितीचे सदस्य लाईफ मेंबर्स व लाईफ मेंबर्स पालक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुधीर साबळे आणि मंजूश्री धीवर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे यांनी आभार मानले.

गृहउद्योगातून महिलांची आर्थिक उन्नती शक्य : संध्या मेढे

अनुसया नगर येथे महालक्ष्मी महिला मंडळाचा महिला सक्षमीकरणाचा उपक्रम

अहिल्यानगर : सर्वसामान्य कुटुंबातील महिलांच्या हाताला काम मिळावे, त्यांना स्वावलंबी बनवावे आणि घराघरात लघुउद्योगांची उभारणी व्हावी या उद्देशाने कल्याण रोड, अनुसया नगर येथील महालक्ष्मी महिला मंडळाच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त महिला सक्षमीकरण, रोजगार निर्मिती व गृहउद्योग उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या उपक्रमामुळे परिसरातील महिलांसाठी स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला झाला आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या संध्या मेढे म्हणाल्या की, प्रत्येक महिलेमध्ये काहीतरी करण्याची क्षमता असते. फक्त तिला संधी आणि योग्य दिशा मिळणे गरजेचे आहे. गृहउद्योगाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होऊ शकते आणि त्या आपल्या कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करू शकतात. महिलांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या उत्पादनांचे मार्केटिंग करावे आणि स्वतःचा ब्रँड निर्माण करावा, असेही त्यांनी आवाहन केले.

या उपक्रमासाठी सीमा शिंदे यांनी पुढाकार घेत परिसरातील महिलांना एकत्र करून रोजगार निर्मितीचे काम उभे केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक महिलांना प्रत्यक्ष रोजगाराची संधी मिळणार असून कुटुंबाच्या उत्पन्नात हातभार लागणार आहे. महिलांच्या पाठीशी उभे राहून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम ड. युवराज शिंदे यांनी केले.

कार्यक्रमाला रेश्माताई आठरे, सीमा शिंदे यांच्यासह परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी रेश्माताई आठरे,सीमाताई शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

महिलांचे सक्षमीकरण झाल्यास संपूर्ण कुटुंबाची आर्थिक उन्नती होते आणि पुढील पिढीला चांगले शिक्षण व संधी उपलब्ध होतात, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

महालक्ष्मी महिला मंडळाच्या या उपक्रमामुळे अनुसया नगर परिसरात महिला सक्षमीकरणाची नवी चळवळ सुरू झाली असून येत्या काळात हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

सोमवार, दि.०४ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

एकाची गळफास घेऊन आत्महत्या, कारण अस्पष्ट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील प्रसादनगर भागातील विजय उणवणे (वय ४५ वर्ष) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल दुपारी घडली आहे. या घटनेचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, राहुरी फॅक्टरी प्रसादनगर येथील रहिवासी विजय भगवान उणवणे (वय ४५ वर्षे) यांनी राहत्या घरात घरामध्ये गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. ही बाब लक्षात येताच तातडीने राहुरी पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोलिस हवालदार बाबासाहेब शेळके यांनी भेट देऊन एका खाजगी रुग्णालयात दाखल केले परंतु उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित करण्यात आले. त्यानंतर मृतदेह ताब्यात घेऊन पुढील वैद्यकीय तपासणीसाठी श्री साई प्रतिष्ठानचे रुग्णवाहिका चालक पप्पू कांबळे यांच्या मदतीने शवविच्छेदनासाठी राहुरी ग्रामीण रुग्णालयात रुग्णालयात पाठवण्यात आला. दरम्यान,आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस करत आहेत. मयत विजय उनवणे यांच्या पश्चात पत्नी दोन मुली एक मुलगा आई असा परिवार असून त्यांच्या मृत्यूने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

आ. विवेक कोल्हे यांच्या स्वागताला उसळला जनसागर

आमदारकीचा सातबारा जरी माझा, पण पोट हिश्यात कार्यकर्त्यांची नावे : विवेक कोल्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांचे आशीर्वाद आणि तळागाळातील सर्व मतदार बंधू भगिनी कार्यकर्ते यांची अलौकिक साथ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचा विश्वास असे म्हणत युवानते विवेक कोल्हे यांनी धन्यवाद देवा भाऊ धन्यवाद या घोषणेने कोपरगावचा आसमंत दुमदुमून टाकला.सायंकाळी सहा वाजता सुरू झालेली विजयी मिरवणूक अकरा वाजता आटोपली. ही एक नवी सुरुवात आहे, पक्ष संघटन वाढवून आपल्याला विकासाचे काम करायचे आहे अशा शब्दात युवा नेते विवेक कोल्हे यांनी कार्यकर्त्यांना विश्वास दिला.

केवळ तालुक्यापुरते मर्यादित म्हणून ही जबाबदारी पक्षाने दिली नसून मोठे काम संघटनात्मक दृष्टीने देखील युवा शक्तीच्या साथीने करायचे आहे.

अत्याधुनिक जीप, उंट, घोडे आणि डोक्यावर घेऊन नाचणारे हजारो युवक कार्यकर्ते, फुले, हार, गुच्छ, सुहासिनींचे ठिकठिकाणी औक्षण, पेढ्यांची रेलचेल, मोठमोठे बॅनर, आकाशात फटाक्यांची बहारदार उडवणूक, डीजेचा दणदणाट, भारतीय जनता पक्षाच्या झेंड्यांची भव्य मोटरसायकल व कार रॅली, संबळ, बँड तडमताशाचा लयबद्ध आवाज, सेल्फी आणि रिल्सचा पाऊस, साथीला देवांचा, श्री साईबाबा तपुभूमी मंदिर येथे आशीर्वाद आणि शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्याप्रति विनम्रतेचा आदर असे वर्णन असलेली युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांची विजयी मिरवणूक सर्वांच्याच मनात भरली.

विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करून कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव थेट मुंबईतून समृद्धी मार्गे स्वागतासाठी आलेल्या युवाशक्तीच्या शेकडो वाहनांच्या ताफ्यात साईबाबा कॉर्नर कोपरगाव येथे विवेक कोल्हे शनिवारी सायंकाळी दाखल झाले त्याप्रसंगी विजयी मिरवणुकीचा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे समारोप करताना ते बोलत होते. शहरात त्यांच्या स्वागतासाठी आता थांबायचं नाहीअसा आशय असलेले फलक ठिकठिकाणी लावण्यात आले होते. विवेक कोल्हे पुढे म्हणाले की, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिन कोल्हे माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली येथून पुढचा राजकीय प्रवास सुरू झाला आहे त्यात सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

अतिशय कमी वयात सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना या मातृसंस्थेच्या अध्यक्षपदापासून आपली कारकीर्द सुरू झाली आहे. कोपरगावच्या राजकीय प्रवाहात अनेक चढउतार आले, २०२४ च्या निवडणुकीत संयम दाखवला त्याचे हे फळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सर्व मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व त्यांचे सर्व पदाधिकारी यांनी दिले. त्यांनी टाकलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करू.

या राजकीय प्रवासात आपल्याला कुठेही ऊतमात करायचा नाही असेही ते म्हणाले व कार्यकर्त्यांना कुठेही आता अन्याय सहन करावा लागणार नाही तुमच्या कामांसाठी मी स्वतः दंड थोपटून उभा आहे काळजी करू नका. आमदारकीचा सातबारा जरी माझ्या नावाने असेल तरी पोट हिश्यात तुमची सर्वांची नावे आहेत त्यामुळे माझ्यासह तुम्ही देखील आमदारच आहात अशा भावनेने जनसेवेसाठी जोमाने कार्यरत राहू. मिरवणूक प्रारंभी कोल्हे कारखाना कार्यस्थळावर असणाऱ्या श्री हनुमान मंदिर आणि श्री महादेव मंदिर येथे दर्शन घेण्यात आले यावेळी बिपीनदादा कोल्हे, रेणुकाताई कोल्हे,सर्व संचालक,कारखाना अधिकारी,पदाधिकारी उपस्थित होते. प्रसंगी संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचे विश्वस्त सुमित कोल्हे,ईशान कोल्हे,नगराध्यक्ष पराग संधान यांनी शहरवासीयांच्या वतीने विवेकभैय्या कोल्हे यांचा भव्य मोठा फुलांचा हार घालून नव्या राजकीय कारकिर्दीचा शुभारंभ केला.

भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक, नगरसेवक, कार्यकर्ते, नागरिक, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सराफ अदापुरे यांना सहआरोपी करा

अन्यथा उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

पानेगाव : करजगाव (ता. नेवासा) येथील सौ. मिनाताई ज्ञानदेव बडाख यांनी चोरीप्रकरणातील सराफ भागवत मधुकर अदापुरे यांना सहआरोपी करण्याची मागणी केली असून, अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. सौ. बडाख या ७ एप्रिल २०२६ रोजी पुणे-पाथर्डी एसटी बसने प्रवास करत असताना शिरूर येथे दोन अनोळखी महिला बसमध्ये चढल्या. त्यापैकी एक महिला त्यांच्या शेजारी बसली. काही वेळाने झोप लागल्यानंतर बॅगेतील सोन्याचे दागिने चोरीस गेल्याचे अहिल्यानगर बसस्थानकावर उतरल्यावर त्यांच्या निदर्शनास आले.

यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी तपास करून माया कल्याण भोसले (रा. हादगाव, ता. शेवगाव) हिला ताब्यात घेतले. चौकशीत तिने चोरीचे सोने बोधेगाव येथील सराफ भागवत अदापुरे यांना विकल्याची कबुली दिल्याचे समजते. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून चोरीचे सोने जप्त केले. या प्रकरणात चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या सराफावरही गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सौ. बडाख यांनी केली आहे. तसेच अशा प्रकारांना पाठीशी घालणाऱ्यांवरही कारवाई व्हावी, असे निवेदन त्यांनी पोलीस अधीक्षकांना दिले आहे. दरम्यान, या गुन्ह्याचा जलद तपास करून सुमारे २५ लाखांचे २० तोळे सोने जप्त केल्याबद्दल कोतवाली पोलिसांचे कौतुक होत आहे.

तुळापूरात दिवसाढवळ्या दरोडा; महिलेवर ब्लेडने हल्ला, परिसरात भीती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सोनगाव : राहुरी तालुक्यातील तुळापूर येथे रविवारी दुपारी सुमारे दीडच्या सुमारास घरफोडी व दरोड्याची धक्कादायक घटना घडली. अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून चोरी करताना विरोध करणाऱ्या महिलेवर ब्लेडने हल्ला केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रमेश बाबुराव हारदे यांच्या घरात चोरट्यांनी प्रवेश करून दरोडा टाकला. रमेश हारदे यांची सुन दीपाली हारदे हिने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केल्याने आरोपींनी तिच्यावर ब्लेडने वार केला.

या हल्ल्यात ती जखमी झाली असून, तिला तातडीने जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तिची प्रकृती

स्थिर असल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून तपास सुरू केला आहे.

आरोपींचा माग काढण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. दरम्यान, चोरीच्या ठिकाणी फॉरेन्सिक पथकानेही पाहणी केली. या वेळी तुळापूरचे सरपंच गणेश पाटील हारदे, सुदाम हारदे पाटील, राजेंद्र सिनारे पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या घटनेमुळे ग्रामीण भागातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, ग्रामस्थांकडून रात्रीच्या गस्तीसह कडक पोलीस बंदोबस्ताची मागणी केली जात आहे.

खळी येथे संशयित इसमाला ग्रामस्थांनी पकडले

पोलिसांनी ताब्यात घेतले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

झरेकाठी : संगमनेर तालुक्यातील खळी येथील सबस्टेशन परिसरात संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका इसमाला ग्रामस्थांनी पकडून चोर असल्याच्या संशयावरून मारुती मंदिरात ठेवून दिल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. या प्रकारामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास संबंधित इसम सबस्टेशन परिसरात आढळून आला.

संशय आल्याने ग्रामस्थांनी त्याला पकडून मारुती मंदिरात ठेवले. घटनेची माहिती तत्काळ आश्वी पोलीस ठाण्याला देण्यात आली होती. मात्र, साडेआठ वाजेपर्यंत पोलीस घटनास्थळी दाखल न झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत होती.

रात्री ८.३४ वाजता आश्वी पोलीस ठाण्याचे एपीआय सुधाकर शिरसाठ व पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी संबंधित संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले. यावेळी एपीआय शिरसाठ यांनी ग्रामस्थांना चौकशी करून योग्य ती कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

दरम्यान, घटनास्थळी सुमारे हजार ते पंधराशे ग्रामस्थ जमल्याने परिस्थिती गंभीर झाली होती. काही ग्रामस्थांनी संबंधित इसमाला त्यांच्या ताब्यात देण्याची मागणी केली. सदर व्यक्ती खरोखर चोर आहे की नाही, हे पोलीस चौकशीनंतर स्पष्ट होणार असून रात्री उशिरापर्यंत पुढील कारवाई सुरू होती.

महिलेच्या धाडसामुळे चोरटे पळाले

लोखंडी रॉड ने केली धुलाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

आश्वी : संगमनेर तालुक्यातील चिचंपूर शिवारात शनिवारी (दि. २) सायंकाळी एका धाडसी महिलेमुळे मोठी चोरी टळली आहे. घरात घुसलेल्या चोरट्याने चाकूचा धाक दाखवूनही डगमगून न जाता, या महिलेने लोखंडी रॉड घेऊन प्रतिहल्ला केल्याने चोरट्यांला पळ काढावा लागला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चिंचपूर शिवारातील 'आठ मोऱ्या' परिसरात भारत धोंडीराम अनर्थे यांचे कुटुंब वास्तव्यास आहे. शनिवारी सायंकाळी ७:३० वाजेच्या सुमारास घरातील महिला नेहमीची कामे करत असताना, अचानक एक अज्ञात चोरटा घरात घुसला. त्याने कपाटाची आणि सामानाची उचकापाचक करण्यास सुरुवात केली.

आवाजामुळे महिला तेथे पोहोचली असता, चोरट्याने तिला चाकूचा धाक दाखवून शांत बसवण्याचा प्रयत्न केला. चोरट्याला पाहून महिला घाबरली, परंतू तिने प्रसंगावधान राखत आरडाओरडा सुरू केला. इतक्यावरच न थांबता, जवळच पडलेला लोखंडी रॉड उचलून ती चोरट्याच्या अंगावर धावून गेली. महिलेचे हे रौद्र रूप पाहून चोरटा पुरता हादरला आणि त्याने तेथून धूम ठोकली. घराबाहेर आणि आत मिळून साधारण दोन ते तीन चोरटे असावेत, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. आरडाओरडा ऐकून शेजारील नागरिक मदतीला धावून आले, तोपर्यंत चोरटे पसार झाले होते. सुदैवाने, या घटनेत कोणतेही आर्थिक नुकसान अथवा मुद्देमाल चोरीला गेला नाही.

या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी तात्काळ सहकाऱ्यासमवेत घटनास्थळी धाव घेतली. तसेच, गावातील १५० ते २०० तरुण आणि ग्रामस्थांच्या मदतीने परिसरात रात्री दोन वाजेपर्यंत शोधमोहीम राबवली, मात्र, चोरट्यांचा मागमूस हाती लागला नाही. दरम्यान, चिंचपूरमधील या घटनेचा अद्याप अधिकृत गुन्हा दाखल झाला नसला, तरी सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट हे गुन्हेगाराचे धागेदोरे शोधत आहेत. नागरीकांनी खबरदारी घ्यावी आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास ताबडतोब पोलीसांना कळवावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

राहुरी विधानसभा पोट निवडणूक निकालाची उत्सुकता शिगेला !

आज ठरणार राहुरीचा आमदार !!

राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : नुकत्याच झालेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या मतमोजणीचा निकाल आज घोषित होणार असून संपूर्ण जिल्हा सह संपूर्ण राज्याचे लक्ष मतमोजणीकडे लागले आहे. होणाऱ्या मतमोजणीसाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली असून आज दिनांक ४ मे सकाळपासून मतमोजणीची प्रक्रिया सुरू होणार आहे. सकाळी साडेआठ वाजता ईव्हीएम (एतच्) मतमोजणीला सुरुवात होईल, तर मतमोजणीचा पहिला कल साडेनऊ ते दहा वाजेच्या दरम्यान येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

दुपारी बारा वाजेपर्यंत निकालाचे चित्र स्पष्ट होणार आहे. होणाऱ्या या मतमोजणीसाठी टपाली मतांसाठी २ टेबल, ईटीपीबीएससाठी ४ टेबल आणि ईव्हीएमसाठी तब्बल १४ टेबल्सची व्यवस्था करण्यात आली आहे. एकूण २७ फेऱ्यांमध्ये ही मतमोजणी पार पडणार आहे. प्रत्येक

टेबलवर निवडणूक अधिकारी, पर्यवेक्षक, सहाय्यक आणि सुरक्षा कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मतमोजणी केंद्रावर कडक सुरक्षा ठेवण्यात आली असून कालच अहिल्यानगरचे नवीन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी ईव्हीएम स्ट्रॉंग रूमची व्यवस्था पाहून योग्य त्या सूचना प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. ओळखपत्राशिवाय प्रवेश बंद आहे. मोबाईल, इलेक्ट्रॉनिक उपकरणे तसेच पेन आणण्यासही मनाई करण्यात आली आहे.

सर्व प्रतिनिधींना आवश्यक साहित्य प्रशासनाकडूनच पुरवले जाणार आहे. राज्यात बहुचर्चित असलेल्या या विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार गोविंद मोकाटे आणि महायुती प्रणित भाजपचे अक्षय कर्डिले यांच्यात मुख्य लढत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे बंडखोर अपक्ष उमेदवार रावसाहेब खेवरे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके या उमेदवारांनीही पोट निवडणुकीत आगळावेगळा पद्धतीने प्रचार करून मोठी रंगत आणल्यामुळे सर्वांचे लक्ष या निकालाकडे लागले आहे. निवडणुकीत एकूण ३ लाख ३३ हजार ५४५ मतदार होते. त्यापैकी १ लाख ८६ हजार ४०५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यात १ लाख १ हजार ९९१ पुरुष आणि ८४ हजार ४१४ महिला मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

आज दुपारी बारा वाजेपर्यंत राहुरी चा आमदार कोण होणार व कोण अंगावर गुलाल घेणार हे स्पष्ट होणार आहे.

रासायनिक पद्धतीने पिकवलेल्या आंब्यांची विक्री?

कारवाई करा अन्यथा आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : शहरातील विविध भागांत केमिकल व कार्बाईडसारख्या घातक रासायनिक पदार्थांच्या सहाय्याने आंबे पिकवून त्यांची सर्रास विक्री होत असल्याचा गंभीर आरोप भारतीय लहुजी सेना व नागरिकांनी केला आहे. या प्रकाराची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन व उपोषण छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. उन्हाळी हंगामात आंब्यांची मोठ्या प्रमाणावर विक्री सुरू असताना काही विक्रेते नैसर्गिक पद्धतीऐवजी रासायनिक पदार्थांचा वापर करून आंबे कृत्रिमरीत्या पिकवत असल्याची तक्रार समोर आली आहे. अशा आंब्यांच्या सेवनामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. अन्न व औषध प्रशासन तसेच भेसळ प्रतिबंधक विभागाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब बागुल, राष्ट्रीय सचिव हनीफ पठाण, जिल्हा संघटक बाळासाहेब त्रिभुवन व जिल्हाध्यक्ष रज्जाक शेख यांनी प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली. शहरातील नागरिकांनीही बाजारात विक्री होणाऱ्या फळांची तपासणी मोहीम राबविण्याची मागणी केली आहे.

आत्मा मालिक एनडीए अॅकाडमीच्या निखील देवरेची लेफ्टनंटपदी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : कोकमठाण येथील आत्मा मालिक एनडीए अकॅडमीने यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली. या अकॅडमीचा शूर कॅडेट निखिल किरण देवरे यांने डडउ ढशलह एर्पीू परीक्षेत दणदणीत यश मिळवीत भारतीय सैन्यदलात लेफ्टनंट पदासाठी आपली जागा निश्चित केली. आता कॅडेट निखिल गया येथे ऑफीसर्स ट्रेनींग अॅकाडमीत ४९ आठवड्यांच्या प्रशिक्षणासाठी जाणार आहे. या प्रशिक्षणानंतर तो सैन्यदलात लेफ्टनंट पदावर रूजू होईल. याबाबत माहिती देताना विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकूमार सूर्यवंशी म्हणाले, आत्मा मालिक एनडीए अॅकाडमीत अनुभवी प्रशिक्षक आहेत. आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. सैन्यदलातील विवीध पदांच्या परिक्षेत येथील विद्यार्थी सातत्याने यश संपादन करीत असतात. निखील देवरे यांच्या लेफ्टनंट पदाच्या निवडीमुळे आत्मा मालिक एनडीएच्या अॅकाडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलाचे शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, वसतीगृह व्यवस्थापिका माई पटेल माई आदिंनी निखील चे अभिनंदन केले.